रायगडात बहरणार 'ड्रॅगन फ्रूट'ची शेती

पान ३ वर

कृषीवल

रायगड ॥ शनिवार, दिनांक ३१ जुलै २०२१

किंमत ४ ₹

PNP
दहावी वर्गोन्नत होऊन, XI प्रवेश घेणाऱ्यासाठी...
पी.एन.पी.कनिष्ठ महाविद्यालयाचा अभिनव संकल्प
XI, XII (कला, वाणिज्य, विज्ञान)
+ स्वयंपूर्ण रोजगाराचे प्रशिक्षण
= रोजगाराची हमी.
संपर्क : ९६५७१९४४५५
पी.एन.पी. शैक्षणिक संकुल, वेश्वी-अलिबाग

महत्त्वाचे

पी.व्ही. सिंधू सेमीफायनलमध्ये

टोकियो : भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूने आपला आक्रमक फॉम कायम राखत टोकियो ऑलिम्पिकमध्ये उपांत्य फेरीत धडक दिली आहे. तिने उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या अकाने यामागुचीवर सहज सरशी साधली. सिंधूच्या नव्या शैलीसमो यामागुची निष्प्रभ ठरली. तिने यामागुचीचा २१-१२, २२-२० असे सरळ सेटमध्ये नमवले.सिंधू आता सुवर्णपदकापासून फक्त दोन पाऊल दूर आहे.

बॉक्सिंगपटू लव्हलिना उपांत्य फेरीत

टोकियो : भारताची युवा बॉक्सिंगपटू लव्हलिना बोर्गोहेनने दोन दिवसांपूर्वी कारकीर्दीतील पहिल्याच ऑलिम्पिकमध्ये उपांत्यपूर्व फेरी गाठण्याची किमया साधली होती. शुक्रवारी महिलांच्या ६९ किलो वजनी गटातील रोमहर्षक उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत लव्हलिनाने चायनीज तैपईची माजी जगज्जेती निन-चीनवर सरशी साधत मात केली आहे.

दीपिका कुमारी स्पर्धेबाहेर!

टोकियो : भारताची आघाडीची महिला तिरंदाज दीपिका कुमारीचा टोकियो ऑलिम्पिकमधील प्रवास संपुष्टात आला आहे. उपांत्यपूर्व फेरीत दीपिकाला दक्षिण कोरियन तिरंदाज अन सानने ०-६ ने पराभूत केले. रशियन ऑलिम्पिक समितीच्या (आरओसी) केन्सिया पेरोवाचा पराभव करून दीपिकाने उपांत्यपूर्व फेरी गाठली होती.

पूरग्रस्तांचे पुनर्वसन करु

। कोल्हापूर । वृत्तसंस्था ।

राज्यावर ओढावलेलं यंदाचं अस्मानी संकट हे भयानक आहे, दरडीखाली लोक गाडले गेले. रस्ते वाहून गेले, खचले. या संकटातून बाहेर पडताना आपले प्राधान्य जीव वाचवण्याला आहे. कायम पुराचा धोका असणाऱ्या गावांनी एकत्र येऊन एकमताने ठराव मंजूर करावा, पुनर्वसनाचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावू, असे आश्वासन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. मुख्यमंत्री ठाकरे यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील पूरग्रस्त भागाचा शुक्रवारी पाहणी दौरा केला.

यावेळी त्यांच्यासमवेत ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री सतेज पाटील, आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र यड्रावकर, खासदार संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, मुख्य सचिव •› पान २ वर

॥ कोल्हापूर दौऱ्यात मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

॥ कायमस्वरूपी तोडगा काढून प्रश्न निकाली लावणार

> पंचगंगा, सावित्री, जगबुडीचे पाणी वाढले की नदीकाठच्या लोकांना स्थलांतर करावे लागते. आता धरणातून बाहेर सोडल्या जाणाऱ्या पाण्याचे नियोजन कसे करायचे ते पाहावे लागेल. याशिवाय कोसळणाऱ्या दरडी, खचणारे रस्ते यासाठी भूगर्भाचा अभ्यास करून नियोजन करण्यात येईल.
> – उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

आजी-माजी सीएम आमनेसामने

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस शुक्रवारी कोल्हापूर पूरपरिस्थितीचा पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर आहेत. दोघांनीही कोल्हापुरातील विविध पूरग्रस्त भागात जाऊन पाहणी केली. जिथं मुख्यमंत्री येणार आहेत, तिथेच फडणवीसदेखील पोहोचले. मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते दोघेही एकाच ठिकाणी शाहुपुरीत भेटले. वेगवेगळी पाहणी करण्यापेक्षा एकत्र पाहणी करूया, असा फोन उद्धव ठाकरेंकडून देवेंद्र फडणवीसांना गेला. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्र्यांची विनंती मान्य करून शाहुपुरीतच थांबण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर एकत्र पाहणी झाली.

महाड-पोलादपूर दुर्घटना

४२ मृतांच्या वारसांना मदत वाटप

॥ १ कोटी ६८ लाख रुपयांचे वितरण

॥ जिल्हाधिकारी निधी चौधरी यांची माहिती

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

महाड आणि पोलादपूर तालुक्यातील तळीये, साखर सुतारवाडी, केवनाळे या तीन दरड दुर्घटनांमध्ये ९५ जणांना आपले प्राण गमवावे लागले. यापैकी ३१ जणांचे मृतदेह हातीही लागले नाहीत. त्यातील ४२ मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना राज्य आपत्ती निवारण निधीतून प्रत्येकी ४ लाख याप्रमाणे १ कोटी ६८ लाख रुपयांचे आतापर्यंत वितरण करण्यात आले आहे. तर, राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी आणि पंतप्रधान मदत व मुख्यमंत्री मदत निधीतील मदतीचे वाटप होणार असून, सदर निधी प्राप्त होताच त्याचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी दिली.

महाड पोलादपूर तालुक्यातील पूरपरिस्थिती आणि त्यानंतरच्या बचावकार्याच्या आढावाबाबत माहिती देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ही माहिती देण्यात आली. महाड आणि पोलादपूर तालुक्यातील नुकसानीचे पंचनामे गतीने सुरु असून, पोलादपूरमधील पंचनामे शुक्रवारी उशिरापर्यंत पूर्ण होतील. त्यानंतर महाड शहरात लक्ष केंद्रित करुन रविवारपर्यंत •› पान २ वर

तळीयेची दरड दुर्घटना अकल्पनीय

जिल्हा आपत्ती निवारण विभागाच्यावतीने करण्यात आलेल्या सर्वेक्षणात दरड प्रवण म्हणून महाड तालुक्यातील तळीये गावाचा समावेश नव्हता. असे असतानाही या गावात दरड दुर्घटना घडणे, हे अकल्पनीय आहे. त्यामागील कारणांचा शोध घेण्यासाठी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण, राज्य इकाई-महाराष्ट्र तसेच प्रकल्प संचालक, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य युनिट, पुणे यांना या गावांचे सर्वेक्षण करुन अहवाल मिळाल्यानंतर समजेल, असेही जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी सांगितले.

पेणमध्ये शेकापचे 'वेट अॅन्ड वॉच'

। पेण । वार्ताहर ।

पेणमध्ये राजकीय हालचालींना मोठ्या प्रमाणात उधाण आलेले आहे. मात्र, शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते आणि पक्षश्रेष्ठी 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत असून, येथील राजकीय परिस्थितीवर व्यवस्थित लक्ष ठेवून आहेत.

भाजपमध्ये तर गृहकलहाची ठिणगीच पडलेली आहे. त्यामुळे भाजप आमदारांना घरातील भांडण मिटवतानाच नाकीनऊ आलेले आहे. तर, भाजपचा एक-एक शिलेदार पक्ष सोडून इतर पक्षामध्ये आपल्याला स्थान कसे मिळेल या प्रयत्नात आहेत. तर, शिवसेनेतदेखील नाराजीचा सूर ऐकायला मिळत आहे. कारण, दलबदलू नेत्यांना •› पान २ वर

॥ भाजपला गृहकलह मिटविताना नाकीनऊ

जिल्ह्यात १४ गावे दरडीच्या छायेखाली

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

महाड आणि पोलादपूर तालुक्यातील दुर्घटनांमध्ये ८४ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील दरड प्रवण भाग जाहीर केले आहेत. यात महाड तालुक्यातील चार तर, पोलादपूर तालुक्यातील १० अशी १४ गावे असून, त्यातील ४१३ कुटुंबातील १ हजार ५५५ जणांना जिल्हा प्रशासनाने तात्काळ सुरक्षित स्थळी स्थलांतरित होण्याचे आवाहन केले आहे.

रायगड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे महाड व पोलादपूर तालुक्यातील काही गावांमध्ये जमिनीला मोठ्या भेगा पडल्या असून, घरांना तडे गेले आहेत. गावातील काही भाग खचून दरड, माती पसरली आहे. नुकतीच घाट माथ्यावर पुन्हा जोरदार पर्जन्यवृष्टी झाली आहे. त्यामुळे या दरड प्रवण भागातील गावकऱ्यांनी प्रशासनाच्या सूचनेनुसार तात्काळ सुरक्षित स्थळी स्थलांतरित व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

दरड प्रवण क्षेत्रातील गावांमध्ये पुढील गावांचा समावेश आहे. महाड तालुक्यातील हिरकणी वाडी, कुटुंबसंख्या १५ लोकसंख्या ७८, मोहोत सुतारवाडी, कुटुंबसंख्या ३१ लोकसंख्या ११५, मोहोत भिसेवाडी कुटुंबसंख्या २५ •› पान २ वर

॥ ४१३ कुटुंबांतील १ हजार ५५५ जणांना स्थलांतरित होण्याचे आवाहन

॥ दरड प्रवण गावे; महाड ४, पोलादपूर १०

शेकापच्या ७४ व्या वर्धापनदिनी

गावागावात फडकणार लाल बावटा

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाचा ७४ वा वर्धापन दिन दरवर्षीप्रमाणे भव्य दिव्य असा साजरा केला जाणार नसला तरी २ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता गावागावात शेकापक्षाचे नेते आणि कार्यकर्ते लाल बावटा दिमाखात फडकावून मानवंदना देणार आहेत. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे साधेपणाने आणि सर्व शासकीय नियमांचे पालन करुनच वर्धापन दिन साजरा केला जाणार असल्याचे जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांनी सांगितले. शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापनदिन दरवर्षी २ ऑगस्ट रोजी •› पान २ वर

नियमांचे पालन करून करणार साधेपणाने साजरा

पर्यटनस्थळे होणार पंचतारांकीत

। मुंबई । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यासह राज्यातील पर्यटनस्थळांचा विकास करण्यात येणार असून, याठिकाणी पंचतारांकीत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्यासाठी एमटीडीसीने पुढाकार घेतला आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची (एमटीडीसी) पर्यटक निवासे आणि मोकळ्या जागा या निसर्गरम्य आणि प्रेक्षणीय पर्यटनस्थळांच्या ठिकाणी आहेत. या ठिकाणी येत असलेल्या पर्यटकांना उत्तम दर्जाच्या सुविधा मिळाव्यात आणि स्थानिक व्यावसायिक, युवकांना रोजगार उत्पन्न होऊन पर्यटनस्थळाचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी •› पान २ वर

॥ पर्यटकांसाठी उपब्लध होणार उत्तम दर्जाच्या सुविधा

॥ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा पुढाकार

मोकळ्या जागांचा होणार विकास

प्रथम टप्प्यामध्ये माथेरान, महाबळेश्वर, हरिहरेश्वर (जि. रायगड) येथील पर्यटक निवास (टुरीस्ट रीसॉर्ट), मिठबाव रिसॉर्ट आणि मोकळी जागा (जि. सिंधुदुर्ग) तसेच ताडोबा आणि फर्दापूर (जि. औरंगाबाद) येथील मोकळ्या जमिनींचा विकास करण्यात येणार आहे. त्यानंतर पर्यटन क्षमतेचा विचार करुन अन्य ठिकाणांची निवड करुन शासन मान्यतेने त्यांचा विकास करण्यात येणार आहे.

बारावीच्या निकालात मुलींची बाजी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

सीबीएसईचा निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आला. यावेळी एकूण १२ लाख ९६ हजार ३१८ विद्यार्थी बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. परीक्षेत पुन्हा एकदा मुलींनीच बाजी असून, उत्तीर्ण होण्याचे प्रमाण मुलांपेक्षा ०.५४ टक्क्यांनी जास्त आहे.

यंदाच्या परीक्षेत ९९.६७ मुली तर ९९.१३ टक्के मुले पास झाली. सलग सहाव्या वर्षी मुलींनी बाजी मारलेली आहे.

पूरग्रस्त भागात वीज बिल वसुली थांबवावी

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

पूर परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या जनतेकडे कुठलीही दया माया न दाखवत महावितरण कंपनीने सुरू केलेल्या सक्तीच्या वीज बिल वसुलीविरोधात शेकापने आक्रमक होत ही वसुली थांबविण्याची मागणी शेकाप नेते पंडित पाटील यांनी केली होती. या मागणीची दखल घेत पूरग्रस्त भागात वीज बिल वसुली न करण्याचे आदेश ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी महावितरण कंपनीला दिले आहेत.

नितीन राऊत यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, आम्ही पूरग्रस्त भागात वीज बिलवसुली करु, नये असे आदेश दिले आहेत. या ठिकाणी वसुली होणार नाही. परिस्थिती पूर्ववत होत नाही तोवर •› पान २ वर

वीज बिल सक्ती विरोधात शेकाप आक्रमक

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात पूर परिस्थिती मुळे अडचणीत सापडलेल्या जनतेकडे कुठलीही दया माया न दाखवता महावितरण कंपनीने सुरू केलेल्या सक्तीच्या वीज बिल वसुली विरोधात आक्रमक झालेल्या

शासनाकडे आज देणार धडक

शेतकरी कामगार पक्षाने शासनाकडे धडक देण्याचा निर्णय घेतला आहे. महावितरण कंपनीने मनमानी कारभार सुरू करून सामान्य जनतेची पिळवणूक सुरू केलेली आहे, भरमसाठ येणारे •› पान २ वर

ऊर्जामंत्र्यांचे महावितरणला आदेश शेकापच्या मागणीची दखल

> शेकापक्षाच्या मागणीची दखल घेत ऊर्जामंत्र्यांनी पूरग्रस्त भागात वीज बिलवसुली थांबविण्याचे आदेश काढून दिलासा दिला. त्याबाबत जनता आणि शेकापच्या वतीने ऊर्जामंत्री नितीन राऊत यांना धन्यवाद देत आहोत.
> – पंडित पाटील, माजी आमदार, शेकाप

पुण्यात मेट्रोची 'ट्रायल रन' यशस्वी

अजित पवारांनी दाखविला हिरवा झेंडा

नोव्हेंबरपर्यंत मेट्रो सेवा सुरू होण्याची शक्यता

। पुणे । प्रतिनिधी ।

पुणेकरांना गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षा असलेल्या मेट्रोची पहिली औपचारिक ट्रायल रन शुक्रवारी सकाळी पार पडली. उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी स्वत: मेट्रोला हिरवा झेंडा दाखवला.

वनाज कारशेड ते आनंदनगर मार्गावर मेट्रो धावली. पहिल्यांदा ट्रायल रन होणार असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड उत्सुकता होती. सकाळची वेळ असूनही मेट्रो मार्गावर काही लोक उपस्थित होते. केवळ तांत्रिक चाचणी असल्यानं कुणीही गाडीतून प्रवास केला नाही. मेट्रो कोचच्या प्रतिकृतीचे उद्घाटनही यावेळी अजित पवार •› पान २ वर

> शहरातील वाढती गर्दी, प्रदूषण, कोंडीवर मेट्रो हा उत्तम पर्याय आहे. निवडणुकांनंतर राजकीय विचार बाजूला ठेवून विकासकामाला महत्त्व देण्याची आमची भूमिका आहे. मेट्रो प्रकल्पाचे काम ६० टक्के पूर्ण झाले असून, पुण्याच्या आधुनिक इतिहासात मेट्रोची नोंद होईल.
> – अजित पवार, उपमुख्यमंत्री

"वैद्यकीय क्षेत्रात नोकरीची सुवर्णसंधी"
अलिबाग -पनवेल प्रवेश सुरु
भारतातील अग्रगण्य पॅरामेडीकल संस्था
DPMI 21 years of Progress
N·S·D·C National Skill Development Corporation Transforming the skill landscape
Skill India कौशल भारत-कुशल भारत
DPMI DELHI PARAMEDICAL & MANAGEMENT INSTITUTE (AN ISO 9001:2008 Certified Institute) "Come Reach the skies with us" Estd. 1996
इंटर्नशिप व १००% नोकरी सहाय्यता
पॅरामेडिकल कोर्सेस
पात्रता: १० वी, १२वी पास / B.Sc. शिकत असलेले विद्यार्थी
UGC Degree / गव्हर्नमेंट डिप्लोमा कोर्सेस
• मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी
• रेडियोलॉजी टेक्नॉलॉजी
• ऑपरेशन थिएटर टेक्नॉलॉजी
• ऑप्थॉल्मिक / ऑप्टोमेट्री टेक्नॉलॉजी
• जनरल ड्यूटी, नर्सिंग असिस्टेंट
• फिजिओथेरपी
• डेंटल टेक्नॉलॉजीस्ट
• डायलिसिस टेक्नॉलॉजी
◆ भारत सरकारचे मान्यताप्राप्त कोर्सेस ◆ नोकरी करत असलेल्यांसाठी विकेंड बॅचेस
◆ हॉस्पिटलस्, डायग्नॉस्टीक सेंटर्स तसेच नर्सिंग होम मधील स्टाफसाठी शॉर्ट टर्म कोर्सेस
" सेवा, सन्मान आणि रोजगार "
Affiliated & Recognised by
ASCI LSSSDC THSC DPMI Skill India Healthcare Sector Skill Council
ब्रँच: ऑफिस २-३,यशोगंगा,सदाशिव पेठ,टिळक रोड,पनवेल,नवी मुंबई - ४१० २०६
ठोसर कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, एल आय सी ऑफीसच्या वर्ती, बस डेपोजवळ,अलिबाग
फोन: ०२२-२७४६७७१५ /९३२३१५४६६२/ ९६१९७३९८८०

'कृषीवल' वसा सामाजिक बांधिलकीचा
पूरग्रस्त बांधवांसाठी
एक हात मदतीचा...
देशात कोठेही आपत्ती ओढवली तर, सढळ हाताने मदत करणाऱ्या रायगड व रत्नागिरी जिल्ह्यांना आज मदतीची गरज आहे. रायगड जिल्ह्यातील महाड येथे आलेल्या महापुराने अनेकांचा संसारच उद्ध्वस्त नाही केला, तर अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. आपले लोक अस्मानी संकटात सापडले आहेत. तेथील लोकांना आज मदतीची गरज आहे. त्यांना मदत करणे आपले कर्तव्य आहे. दोन्ही जिल्ह्यांत शेतीचे, घरांचे तसेच जनावरांचे, प्रापंचिक साहित्याचे नुकसान झाले आहे. त्यामुळे पुढे या, कृषीवलच्या जोडीने सामाजिक बांधिलकीचा वसा घ्या अन् पूरग्रस्तांना मदत करा. तुमच्या मदतीची दखल कृषीवल नक्कीच घेईल. तसेच पारदर्शक व्यवहारासह तुमची मदत थेट पूरग्रस्तांपर्यंत पोहोचेल. याशिवाय तुमचे छायाचित्र वृत्तपत्रात प्रसिद्धही करण्यात येईल. चला तर मग कृषीवलच्या या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊ या आणि पूरग्रस्तांना आधार देऊ या.
रायगड
रत्नागिरी
आपण दिलेली अनमोल मदत आम्ही तात्काळ पूरग्रस्तांपर्यंत पोहोचवू.
आपण काय देऊ शकता?
जीवनावश्यक वस्तू, कपडे, अन्नधान्य, आर्थिक स्वरुपाची मदत
संपर्क : कृषीवल कार्यालय, अलिबाग
माधवी सावंत : ९८२३२५१८०० हर्षा नाईक : ८३८००५५८३९
भारत रांजणकर : ९२२६१५२४८९ दर्शना पाटील : ८९७५९८९०१०
भैरवी पाटील : ९१७५७०८९०६ सुरेंद्र वेळे : ८३८००५५९९८

धरमतर खाडीतील प्रदूषणामुळे उपासमार

कंपनीच्या सांडपाण्यामुळे पाण्याला उग्र वास, मासेमारीवर परिणाम

। पेण । वार्ताहर ।

धरमतर खाडीच्या होणाऱ्या प्रदुषणामुळे उपासमारीची वेळ परिसरातील शेतकरी आणि मच्छिमारांवर आली आहे. कंपनीच्या सांडपाण्यामुळे खाडीच्या पाण्याला उग्र वास येऊ लागल्याच्या तक्रारीही वाढल्या आहेत. याचा परिणाम पेण तालुक्यातील शेती आणि मत्स्य उत्पादनावर होत आहे.

आयपीसीएल कंपनीच्या सांडपाण्यामुळे गेली ३५ वर्ष धरमतर खाडी प्रदूषित आहे. त्यानंतर १९९२ च्या सुमारास डोलवी गावाजवळ लोखंडाची इस्पात कंपनी आली. इस्पात कंपनीचे मोठमोठाले माल वाहतूक करणारे जहाज देखील ये-जा करू लागले. त्याचप्रमाणे या कंपनीतून उडणारा लाल रंगाची धूळ खाडीत येऊन पडू लागली. धरमतर खाडीत कधी आयपीसीएल (रिलायन्स) तर कधी निप्पॉन इस्पात (जे.एस.डब्ल्यू) मुळे प्रदूषणाला सुरूवात झाली. जे.एस.डब्ल्यू कंपनीतून जो प्रदूषण होतोय त्याच्या दसपटीने प्रदूषण हा आयपीसीएल (रिलायन्स) कंपनीच्या सांडपाण्यामुळे होत असल्याचे स्थानिकांचे मत आहे. हे प्रदूषण होत असताना प्रदूषण नियंत्रण मंडळ व औद्योगिक विकास महामंडळ फक्त बघ्याची भूमिका घेत असून या प्रदूषणामुळे मच्छिमार व शेतकऱ्यांची उपजिविकेचे साधनच नामशेष व्हायला सुरूवात झाली.

या प्रदूषणामुळे मासेमारी व्यवसायावर विपरित परिणाम व्हायला सुरूवात झाली. धरमतर खाडीचा विचार करता रिलायन्स व जे.एस.डब्ल्यू या दोन कंपन्या आहेत. मात्र मोठ्या प्रमाणात प्रदूषित केमिकल मिश्रीत सांडपाणी हे रिलायन्स कंपनीतून थेट धरमतर खाडीत सोडले जात आहे. दरवर्षी पावसाळ्याला सुरूवात झाली की केमिकलयुक्त पाणी नदीपात्रात सोडल जाते. आणि हा काळ तसा पाहता माशांचा प्रजननांचा काळ असतो.

२५ कि.मी. पट्ट्यात सांडपाण्याचा फटका

सांडपाणी सोडल्यानंतर जवळपास नागोठण्यापासून ते हाशिवरेपर्यंतचा २० ते २५ किलोमीटरचा पट्टा प्रदूषित होतो. त्यामुळे या २० ते २५ किलो मिटरच्या खाडीमध्ये मच्छिमारी करणे शक्य होत नाही. कारण या २० ते २५ किलोमीटर अंतरावर मच्छी मिळत नाही आणि क्वचित प्रमाणात मच्छी मिळाल्यास त्याला केमिकलचा वास येतो. त्यामुळे एकंदरीत या परिसरात राहणाऱ्या मच्छिमारांचे उपजिविकेचे साधनच लुप्त होत चालले आहे.

इस्पातकडून कांदळवनाची कत्तल

इस्पात कंपनीतून उडणारा लाल धूळ नदीकाठच्या कांदळवनांवर पडून कांदळवन नष्ट व्हायला सुरूवात झाली आहे. या कांदळवनांना जून-जुलै च्या सुमारास मासे प्रजननासाठी वास्तव्य करत असतात. परंतु खाडी किनाऱ्यावरील कांदळवन नाहीसा होत चालल्याने मासे प्रजननासाठी या भागात फारसे फिरकत नाहीत त्यातच आयपीसीएलचा केमिकल युक्त पाणी या दोघांचा विचार करता जवळपास मच्छिमारी व्यवसाय हा नसल्याच्याबरोबरच या विभागात आहे. तसेच कंपनीचे चाललेले बांधकाम सीआरझेडचे उल्लघंन करूनच होत आहे. त्यामुळे भविष्यात या दोन कंपन्यामुळे होणारे प्रदूषण आणि त्याची तिव्रता ही भयानक असणार आहे. वेळोवेळी स्थानिकांकडून प्रशासनाकडे लेखी निवेदन देऊन सुद्धा या सांडपाण्याचा अगर लाल धूळीचा प्रश्न निकाली निघत नाही. अथवा त्यावर उपाययोजना केले जात नाही. कित्येक वर्ष प्रदूषणाचा प्रश्न तसाच कायम आहे. त्याचा नाहक त्रास नागरिकांना होत आहे. साधारणतः ३५ वर्षाचा कालखंड पाहता या प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चाललेले आहे. हे कुठे तरी थांबले नाही तर स्थानिक मच्छिमार व शेतकऱ्यांची अवस्था खूप कठीण होईल यात काही शंकाच नाही.

प्राथमिक शिक्षक समन्वय समितीतर्फे
पूरग्रस्तांना मदत

। पाली/बेणसे ।प्रतिनिधी ।

अतिवृष्टीने महाड-पोलादपूर सह विविध भागात मोठी नैसर्गिक आपत्ती ओढवली. येथील पूरग्रस्त संकटात सापडले, त्यांना मदतीची नितांत गरज भासू लागली, यावेळी सुधागड तालुक्यातील सर्व प्राथमिक शिक्षकांना समन्वय समितीने मदतीचे आवाहन केले.

या आवाहनास सुधागड तालुक्यातील केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच आंतरजिल्हा बदली होऊन गेलेल्या शिक्षकांनी या विधायक कार्यास हातभार लावून जवळजवळ दीड लाख निधी अवघ्या दोन दिवसात उभा केला. या निधीतून पूरग्रस्तांना आवश्यक किट असे १०० किट तयार करून महाड व पोलादपूर येथील आसानपोई बौद्धवाडा,आसानपोई गाव, लोहारमाळ, चरई, चरई भोईवाडी, पोलादपूर मोहल्ला, महाड राजेवाडी स्थलांतरीत मोहल्ला, महाड बाजारपेठ अशाप्रकारे गरजू पूरग्रस्त गाव व वाड्यावर जीवनावश्यक किट प्रत्यक्ष लाभार्थ्यांना त्यांच्या हातात देऊन सुधागड प्राथमिक शिक्षकांनी आपले सामाजिक दायित्व जपले.

मासेमारीसाठी सज्ज झालेली होडी. (आम्ही अलिबागकर)

महावितरणच्या वीजयोद्ध्यांनी
पोलादपूर, महाड केले प्रकाशमय

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

कोकणासह पश्चिम महाराष्ट्रात आलेल्या अतिवृष्टीमुळे महाड, खेड, चिपळूण व लगतच्या भागात जनजीवन पुर्णपणे विस्कळीत झाले आहे. अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहे. महावितरणची विद्युत यंत्रणा महाड व पोलादपूर येथे मोठ्या प्रमाणात बाधित झाली असून, दोन्ही तालुक्यातील अनेक गावे अंधारात बुडाली होती. अशा परिस्थितीत अति उच्चदाब केंद्र बंद असतानाही महावितरणच्या वीजयोद्ध्यांनी महाड, पोलादपूर प्रकाशमय केले आहे. या कामगिरीचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी कौतुक केले आहे.

दरम्यान, ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी नुकताच रायगड जिल्ह्यातील महाडचा दौरा केला व वीजपुरवठा लवकरात लवकर सुरु करण्यासाठी युद्धपातळीवर काम करण्याचे निर्देश दिले. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी लागणारे साहित्य तसेच मनुष्यबळाचे योग्य नियोजन तातडीने करून कामाला सुरुवात करण्यास सांगितले. त्याप्रमाणे, संचालक (संचलन) संजय ताकसांडे यांनी दैनंदिन अहवाल मागवून सुरु असलेल्या कामाचा आढवा वेळोवेळी घेतला. मुख्य अभियंता सुरेश गणेशकर स्वतः महाड येथे तळ ठोकून होते व जातीने लक्ष देऊन सुरु असलेल्या कामाचे निरीक्षण करीत अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योग्य मार्गदर्शन दिले. महापारेषणचे अति उच्चदाब उपकेंद्र बंद असताना ही अहोरात्र मेहनत करून महावितरणचे अधिकारी/कर्मचाऱ्यांना महाड व पोलादपूर येथील अनेक गावे प्रकाशमान करण्यात यश आले आहे.

भांडूप परिमंडलातील रायगड जिल्ह्यात वीज यंत्रणेचे मोठे नुकसान झाले. मुसळधार पावसामुळे व पूरस्थितीमुळे दि.२२ जुलै रोजी महापारेषणच्या कांदलगाव ते महाड दरम्यान असलेले २२० के.व्ही.अति उच्चदाब वीज वाहिनीचे दोन टावर कोसळल्यामुळे, महावितरणच्या पेण मंडळातील चांभारखिंड, जी. बी. एल, कोलोसे व तुर्भे हे चार स्विचिंग उपकेंद्र बंद पडले होते. परिणामी, महाड व पोलादपूर येथील महाड शहर, बिरवाडी, विन्हेरे, वहूर, नाते, नांगळवाडी, नागाव, कुंबळे येथील ३४५ गावांचा वीजपुरवठा बाधित झाला असून, महाड येथील १८४ गावांपैकी १११ गावे प्रकाशमय केली आहेत.

पूरग्रस्त सभासदांना चिपळूण नागरी पतसंस्थेमार्फत मदत

। चिपळूण । प्रतिनिधी ।

चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेमार्फत पूरग्रस्तांना प्रचलित व्याजदरापेक्षा कमी व्याजदरात कर्जपुरवठा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष सुभाष शहाण यांनी दिली.

गेल्या आठवड्यातील अतिवृष्टीमुळे चिपळूण, खेड, संगमेश्वर, राजापूरसह जिल्ह्यामधील अन्य तालुक्यांत व्यापारी, लहान-मोठे उद्योजक तसेच वाहनधारक, सर्वसामान्यांना मोठ्या अस्मानी संकटाचा फटका बसला आहे. चिपळूण शहरातील परिसरातील सर्व भाग मोठ्या प्रमाणावर पूर क्षेत्राखाली आला आहे. या सर्वांना मदतीचा हात देण्यासाठी चिपळूण नागरी पतसंस्था 'आपल्या आपली माणसे, आपली संस्था' या ब्रीद वाक्याला साजेशी अशी सामाजिक बांधीलकी जपण्याची परंपरा कायम ठेवून एक वेगळा ठसा समाजामध्ये निर्माण करणार आहे. नैसर्गिक संकटात चिपळूण शहरातील तसेच जिल्ह्यामधील बाधित झालेल्या संस्थेच्या सभासदांना संस्थेमार्फत अन्नधान्याचे किट घरपोच देण्यात येणार आहे. यासाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी एक दिवसाच्या पगाराची रक्कम बाजूला काढून संस्थेच्या माध्यमातुन हे वाटप करण्यात येणार आहे.

नेटिझन्सनी साजरा केला अभिनेता सोनू सुदचा वाढदिवस

वर्षा मेहता
। अलिबाग ।

सोनू सूद आता फक्त बॉलिवूड अभिनेता नाही, तो भारतातील अनेक लोकांसाठी मसीहा बनला आहे आणि अनेकांसाठी तो देव आहे. कारण त्याने विद्यार्थी आणि वैद्यकीय रुग्णांना आधार देण्यासाठी अहोरात्र काम केले आहे. देशाच्या विविध भागांमध्ये अडकलेल्या स्थलांतरितांना त्यांच्या मूळ गावी परत पाठवण्यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. गरजू लोकांना मदतीचा हात पुढे करण्यात अभिनेत्याने कोणतीही कसर सोडली नाही.

तो केवळ स्थलांतरित कामगार, देशाच्या विविध भागांमध्ये अडकलेल्या लोकांना मदतीचा हात देत नाही तर बेघरांना आणि मुलांना अन्न पुरवतो. त्याच्या प्रयत्नांनी कोट्यवधींची मने जिंकली आहेत आणि त्याला अनेकांनी 'वास्तविक जीवनातील नायक' (real life hero) म्हणून संबोधले आहे. भारतात स्थलांतरित कामगारांना अर्थपूर्ण रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सोनू सूद यांनी 'प्रवासी रोजगार' नावाचे एक विनामूल्य ॲप आणि वेबसाइट सुरू केली. नोकरी शोधणाऱ्यांना नोकरी देणाऱ्यांशी जोडण्यासाठी हे व्यासपीठ तयार करण्यात आले आहे. त्यामुळे त्याचे सर्व स्तरातून कौतुक केलं जातंय. त्याच्या ४८ व्या वाढदिवसानिमित्त देशातील सगळ्या भागातून त्याच्या चाहत्यांनी सोशल मिडियावर शुभेच्छांचा वर्षाव केला. हॅशटॅग हॅप्पी बर्थ डे सोनू सुद ट्रेंड केले. अनेकांनी असे मत व्यक्त केले की सोनू सुदने केलेले सामाजिक कार्य देश कधीच विसरणार नाही.

SOCIAL MEDIA पडसाद

हॅशटॅग हॅप्पी बर्थ डे सोनू सुद झाले ट्रेंड

पान १ वरुन

४२ मृतांच्या वारसांना मदत वाटप

येथील नुकसानीचे पंचनामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी सांगितले.

महाड व पोलादपूर तालुक्यात दि.२२ व २३ जुलै रोजी अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती व दरड कोसळण्याची घटना घडली आहे. त्यामध्ये लोकांची घरे वाहून गेली असून, अनेक लोकांचा मृत्यू झालेला आहे. तसेच अनेक लोकांच्या घरामध्ये पुराचे पाणी गेल्याने खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. याबाबत प्रशासनाने पंचनाम्याची कार्यवाही सुरु केली आहे. हे पंचनामे सुरु असून, दि.२६ ते २९ जुलै या कालावधीत करण्यात आलेल्या पंचनाम्यानुसार प्राप्त झालेली नुकसानीची माहिती जिल्हा प्रशासनाने जाहीर केली आहे. पंचनाम्याची कार्यवाही अजूनही सुरु आहे.

पंचनाम्याच्या कार्यवाहीत नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी केले आहे. झालेल्या नुकसानीबाबतची दि.२६ ते २९ जुलै या कालावधीतील पंचनाम्यानुसार प्राप्त माहिती पुढीलप्रमाणे

महाड तालुक्यातील नुकसानीबाबतची माहिती :- एकूण बाधित कुटुंब संख्या १४ हजार ३६८ त्यापैकी पंचनामे झालेल्या कुटुंबसंख्या ८ हजार १५१ शिल्लक पंचनामे कुटुंबसंख्या ६ हजार २१७ घरे अंशतः संख्या ८ हजार १२१, घरे पूर्णतः संख्या ३०, गोठे/वाडा संख्या १०, दुकाने संख्या ०, मंदिर संख्या १, अंगणवाडी संख्या १, शाळा संख्या २, सार्वजनिक मालमत्ता संख्या ३, मोठी जनावरे संख्या ११, छोटी जनावरे संख्या २, बकरी संख्या १५, कोंबड्या संख्या ०, शेती विविध प्रकारची नुकसान क्षेत्र हे आर मध्ये ८४.४४ हे आर, एकूण बाधित शेतकरी संख्या ४४१ इत्यादी झालेले नुकसान आहे.

पोलादपूर तालुक्यातील नुकसानीबाबतची माहिती :- एकूण बाधित कुटुंबसंख्या ७५१ त्यापैकी पंचनामे झालेल्या कुटुंबसंख्या ५६०, शिल्लक पंचनामे कुटुंबसंख्या १९१ घरे अंशतः संख्या ५५२, घरे पूर्णतः संख्या ८, गोठे/वाडा संख्या १८, दुकाने संख्या ०, मंदिर संख्या १, अंगणवाडी संख्या २, शाळा संख्या ०, सार्वजनिक मालमत्ता संख्या २, मोठी जनावरे संख्या ३२, छोटी जनावरे संख्या ०, बकरी संख्या ८, कोंबड्या संख्या ५, शेती विविध प्रकारची नुकसान क्षेत्र हे आर मध्ये ३०.०० हे आर, एकूण बाधित शेतकरी संख्या १२१, इत्यादी झालेले नुकसान आहे.

आता आजार रोखण्यासाठी प्रयत्न

पूरपरिस्थितीनंतर आता महाड पोलादपूर तालुक्यात अस्वच्छतेमुळे उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांची साथ रोखण्याची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यासाठी जनतेने सहकार्य करुन अधिकाधिक खबरदारी घेण्याची गरज आहे. डायरिया होऊ नये यासाठी विशेषतः लहान मुलांना योग्य ते औषधे तसेच ओआरएस देण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

कोरोना संसर्गितांचे गृहविलगीकरण

महाड आणि पोलादपूर तालुक्यात पूरपरिस्थितीनंतर कोरोनाची टेस्ट करुन घेणे आवश्यक आहे. मात्र, रुग्णालयात विलगीकरणाच्या भीतीमुळे नागरिक टेस्ट करुन घेण्यास तयार नाहीत. त्यामुळे कोरोना संसर्गित आढळणाऱ्या व्यक्तींना रुग्णालयात दाखल करण्याची सक्ती न करता घरीच विलगीकरण करण्यास परवानगी देण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने त्यांच्यासाठी सर्व औषधोपचार पुरविण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले.

जिल्ह्यात १४ गावे दरडीच्या छायेखाली

लोकसंख्या ७५, वाघेरी (आदिवासीवाडी) कुटुंबसंख्या ४५ लोकसंख्या १४८, तसेच पोलादपूर तालुक्यातील साखर सुतारवाडी कुटुंबसंख्या ४० लोकसंख्या १६०, साखर कुटुंबसंख्या २० लोकसंख्या ८०, साखर (चव्हाणवाडी) कुटुंबसंख्या २४ लोकसंख्या ९५, साखर पेढेवाडी कुटुंबसंख्या २० लोकसंख्या ८०, केवनाळे कुटुंबसंख्या ८० लोकसंख्या २४०, दाभीळ कुटुंबसंख्या ४० लोकसंख्या १२०, चरई कुटुंबसंख्या १४, लोकसंख्या ६३, माटवण मोहल्ला कुटुंबसंख्या ९ लोकसंख्या ४०, सवाद कुटुंबसंख्या ४० लोकसंख्या २१६, कनगुले कुटुंबसंख्या १०, लोकसंख्या ४५.

महाड व पोलादपूर तालुक्यातील मिळून एकूण कुटुंबसंख्या ४१३ असून, लोकसंख्या १ हजार ५५५ आहे. प्राथमिक निरीक्षणावरुन या गावांना दरड कोसळण्यापासून धोका असल्याचे दिसून आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण, राज्य इकाई-महाराष्ट्र तसेच प्रकल्प संचालक, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य युनिट, पुणे यांना या गावांचे सर्वेक्षण करुन सविस्तर अहवाल सादर करण्यास कळविले आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो शासनास सादर केला जाईल व या गावांमध्ये दरड प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्यात येतील.

पेणमध्ये राजकीय हालचालींना उधाण

घेतल्याने शिवसैनिक अतिशय नाराज होऊन पक्षश्रेष्ठीला अद्वातद्वा बोलत आहेत. तर, काँग्रेसचे कार्यकर्ते वाऱ्यावर सोडल्याप्रमाणे मन मानेल तसे वागत आहेत. एकंदरीत, पेण तालुक्यात शेतकरी कामगार पक्ष वगळता इतर पक्षातील कार्यकर्ते या पक्षातून त्या पक्षात उड्या मारताना दिसतात.

गेल्या दोन वर्षामध्ये एकही शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता इतर कोणत्याही पक्षामध्ये गेलेला नाही. भाजपमधून जोरदार आऊटगोईंग सुरू आहे. कमी-अधिक प्रमाणात शिवसेनेतूनदेखील आऊटगोईंग सुरू आहे. तर, राष्ट्रवादीमध्ये जोरदार इनकमिंग सुरू आहे. मात्र, पेण तालुक्यात स्थानिक राष्ट्रवादीचा भरभक्कम नेता नसल्याने राष्ट्रवादीचे तीन गट पहायला मिळत आहेत. एक गट ग्रामीण भागातील, तर दोन गट हे शहरात कार्यरत आहेत. नव्या-जुन्याचा वाद हा वेगळाच. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस हे जरी महाविकास आघाडीमध्ये असले, तरी पेण तालुक्यात एकमेकांवर कुरघोडी करतानाच आपल्याला पहायला मिळतात. मात्र, शेतकरी कामगार पक्षाचे पक्षश्रेष्ठी व कार्यकर्ते हे इतर पक्षात चाललेल्या कुरघोडींकडे लक्ष ठेवून असल्याने येणाऱ्या काळात होणाऱ्या निवडणुकींमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार यात काही शंकाच नाही. पेण तालुक्यातील आत्ताच्या घडीला नंबर एकचा पक्ष म्हणून शेतकरी कामगार पक्षाकडे राजकीय जाणकार पाहात आहे.

गावागावात फडकणार लाल बावटा

दिमाखदारपणे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. मात्र, यावर्षी येणारा शेकापक्षाचा ७४ वा वर्धापनदिन यावर्षी कोरोनाचे संकट असल्यामुळे सामाजिक भान राखून दरवर्षीच्या परंपरेनुसार करण्याऐवजी सर्वांच्या आरोग्याची काळजी घेऊन प्रत्येक गावात नियमांचे पालन करुनच साजरा करण्याचा निर्णय शेकापने घेतला आहे. यादिवशी शेकाप कार्यालयात, तसेच गावागावात आणि तालुक्याच्या ठिकाणी शासनाच्या सर्व निमयांचे पालन करुनच सकाळी १० वाजता ध्वजारोहण करण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांनी दिली.

शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन म्हणजे डाव्या विचारांच्या पुरोगामी कार्यकर्त्यांचा उत्साहाचा दिवस असतो. या दिवशी रायगड जिल्ह्यात मोठा उत्साह पाहायला मिळतो. मोठ्या प्रमाणावर साजऱ्या केल्या जाणाऱ्या वर्धापनदिनी अनेक डावे विचारांचे विचारवंत नेते एकत्र येत एक वेगळा विचार महाराष्ट्राला देत असतात. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या वर्धापनदिनाकडे लागलेले असते. शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजऱ्या केल्या जाणाऱ्या या वर्धापनदिनी शेकापचे रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांबरोबरच महाराष्ट्रातील डाव्या विचारांचे कार्यकर्तेदेखील हजेरी लावत असतात.

मात्र, २०२० सालापासून कोरोनाचे संकट संपूर्ण जगभरात आहे. देशात आणि महाराष्ट्रात त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातदेखील कोरोनाने विळखा घातला आहे. त्यामुळे यावर्षी शेकापचा ७४ वा वर्धापन साजरा करताना तो मोठ्या प्रमाणावर भव्य दिव्य स्वरुपात साजरा न करता सोमवार, दि. २ ऑगस्ट रोजी साध्या पद्धतीने वर्धापन दिन साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पक्षाच्या तालुका चिटणीसांनी वर्धापनदिन आपापल्या तालुक्यात पक्ष कार्यालयात शासनाचे सर्व नियमांचे पालन करुन सकाळी १० वाजता प्राथमिक स्वरुपात ध्वजवंदन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी आपापल्या ग्रामपंचायती स्तरावर शासनाचे सर्व नियम पाळून झेंडावंदन करण्याचे आवाहन जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांनी केले आहे.

पर्यटनस्थळे होणार पंचतारांकीत

एमटीडीसीने पुढाकार घेतला आहे. याठिकाणी पंचतारांकित दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. त्यामुळे देशी-परेदशी पर्यटकांना रायगडसह महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांविषयी आकर्षण निर्माण होऊन पर्यटन विकसित होण्यास मदत होणार आहे.

याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून महामंडळाकडे असलेल्या मोकळ्या जमिनी आणि विकसित केलेल्या मालमत्तांना भागिदारी तत्त्वावर (पीपीपी) विकसित करून राज्यातील काही निवडक पर्यटनस्थळांचा जागतिक मानकांनुसार विकास करण्यात येणार आहे. त्यानुसार ४ आणि ५ तारांकित पर्यटन आणि हॉटेल व्यावसायिक यांच्याबरोबर भागिदारी होणार आहे. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार असल्याने पर्यटनासाठी संधी उपलब्ध होणार आहेत. अम्युझमेंट पार्क, साहसी क्रीडा, वॉटर पार्क आदी विकसित होणार आहेत. महाराष्ट्राची लोककला, खाद्यसंस्कृती, निसर्गरम्य समुद्रकिनारे, ऐतिहासिक गडकिल्ले, थंड हवेची ठिकाणे आणि निसर्गसंपन्न डोगररांगा या ठिकाणी पर्यटन मोठ्या प्रमाणावर विकसित होणार आहे.

शासकीय जमिनी, मालमत्तांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी पीपीपी, जॉईंट व्हेंचर, नॉनजॉईंट व्हेंचर, प्रवर्तन आणि व्यवस्थापन करार किंवा फक्त व्यवस्थापन करार इत्यादी उपलब्ध विविध पर्यायांचा विचार करुन निर्णय घेण्यात येणार आहे. त्यानुसार या मालमत्तांचा विकास करण्यासाठी निविदा काढण्यात आल्या असून, त्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

पर्यटन क्षेत्रात सध्या कोरोना महामारीमुळे आलेली मरगळ या निर्णयामुळे कमी होणार असून, पर्यटन क्षेत्र नव्याने उभारी घेईल. पर्यटकांना पंचतारांकित सुविधा उपलब्ध होणार असल्याने स्थानिक व्यावसायिक, टूर ऑपरेटर, ट्रॅव्हल कंपन्या आणि स्थानिक उत्पादनांना नव्याने बाजारपेठ मिळेल.

- दीपक हरणे, व्यवस्थापक, महामंडळाचे पुणे प्रादेशिक

'ट्रायल रन' यशस्वी

यांच्या हस्ते करण्यात आले. पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ, महामेट्रोचे एमडी ब्रीजेश दीक्षित हे यावेळी उपस्थित होते. ऑक्टोबर ते नोव्हेंबरपर्यंत वनाज ते गरवारे कॉलेजदरम्यानच्या पाच किलोमीटर मार्गावर मेट्रो सेवा सुरू होईल, असा विश्वास महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक ब्रीजेश दीक्षित यांनी व्यक्त केला. कोरोनाचे संकट असल्यामुळं पुणेकरांना त्रास होऊ नये म्हणून ट्रायल रन सकाळी लवकर घेतल्याची माहिती अजित पवार यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना दिली. पूर्वी कार्यक्रमांना गर्दी झाल्यामुळं संयोजकांवर गुन्हा दाखल झाले आहेत. तसे आज होऊ नये म्हणून कमीत कमी उपस्थितीत कार्यक्रम घेतला, असं पवार म्हणाले.

पूरग्रस्तांचे पुनर्वसन करु

सीताराम कुंटे यांच्यासह अन्य अधिकारी आणि नेतेमंडळी उपस्थित होते.

नृसिंहवाडी तीर्थक्षेत्र येथे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पूरपरिस्थितीची पाहणी करुन पूरग्रस्त स्थानिक रहिवाशांशी संवाद साधला. तसेच पूरग्रस्तांसाठी निर्माण करण्यात आलेल्या पद्मराजे हायस्कूल शिरोळ येथील निवारा केंद्रास भेट देऊन संवाद साधला. नृसिंहवाडी येथे स्थानिकांनी २०१९ चा पूर, सुरु असलेली कोरोनाची परिस्थिती व आता आलेला महापूर यामुळे येथील सर्वच जनजीवन विस्कळीत झाले असून, याबाबत ठोस कार्यवाही व्हावी, अशी मागणी स्थानिक पूरग्रस्त नागरिक, व्यापारी, देवस्थानचे पदाधिकारी यांनी केली.

पूरग्रस्त भागात वीज बिल वसुली थांबवावी

वीजबिलंदेखील दिली जाणार नाहीत. लोकांचे खूप मोठं नुकसान झालं आहे. परिस्थिती निवळल्यानंतर वीज बिल देत असतानाही कितपत दिलासा देऊ शकतो याचा विचार समिती करत आहे. दरम्यान, नितीन राऊत यांनी यावेळी वीजबिल माफ करण्यासंबंधंचा निर्णय मंत्रिमंडळाकडे असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

भाटिया हॉस्पिटलमध्ये विश्वस्तांविरोधात आक्रोश आंदोलन

। आंबेत । वार्ताहर ।

अति मुसळधार पावसात कोकणची न भरून निघणारी हानी झाली आणि यामध्ये अतोनात नुकसान देखील झालं, कुठे रस्ते वाहून गेले तर कुठे घरे अशातच म्हसळा तालुक्यातील पांगळोली परिसरात असलेल्या एका मुख्य रस्त्यावरील मोरीचा भाग देखील या पावसात खचल्याने रस्त्याला भल मोठं भगदाड पडलं आहे या प्रकारामुळे या रस्त्यावरील वाहतुकीचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे, सध्या या रस्त्यावरून एकेरी वाहतूक सुरू असली तरी भविष्यात या परिसरात अपघात घडण्याची दाट शक्यता वर्तविण्यात आली आहे. मुख्य वळणाचा भाग असल्याने समोरील वाहन खचलेल्या रस्त्यात जाण्याची भीती देखील सांगण्यात आली आहे, दोन वर्षांपूर्वीच या मोरीचा नव्याने बांधण्यात आलेला भाग खचतोच कसा असा सवाल आता नागरिक तसेच प्रवाशी वर्गाकडून उपस्थित होतोय, त्यामुळे अशा बोगस ठेकेदारांची मनमानी सामान्य नागरिकांच्या जीवावर बेतत असल्याचं चित्र समोर आलंय.

दुसरीकडे आंबेत पांगळोली या राज्यमार्गावरील झाडी झुडपांचा भाग देखील रस्त्यावर आल्याने या मार्गावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या गोष्टीकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे. अन्यथा मोठ्या अपघातांना येथील प्रवाशांना सामोरे जावे लागणार आहे.

वाढलेली झुडपे ही रस्त्याच्या निम्म्यापेक्षा जास्त भागात पोहचल्याने समोरून येणार वाहन हे न दिसू येत असल्याने आपला जीव मुठीत घेऊन प्रवाशी वर्गाला प्रवास करावा लागत आहे, त्यामुळे लवकरात लवकर या समस्यांचे काम मार्गी लावण्यात यावे अशी विनंती आता येथील स्थानिक नागरिकांडून होताना दिसत आहे.

श्री सदस्यांनी पूरग्रस्त भागात स्वच्छता मोहीम

। मुरुड । प्रतिनिधी ।

रेवदंडा येथील डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या मुरुड तालुक्यातील काशीद, मजगाव, आदाड, राजपुरी, आगरदांडा, टोकेखार इत्यादी परिसरातील सुमारे ३८३ श्री सदस्यांनी प्रतिष्ठानचे श्री आप्पासाहेब धर्माधिकारी व श्री सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महाड येथील पुरग्रस्थ भागातील राजेवाडी, कोंडिवले, दादले, खरवली, कोल या भागातील शाळा, आंगणवाड्या, ग्रामपंचायत कार्यालये तसेच मंदिरे यामधील सुमारे २७ ट्रक गाळ व चिखल, कचरा साफ करून यशस्वी स्वच्छता अभियान मोहीम राबवली.

उरणमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक सुरूच

बनावट बॉण्ड पेपरद्वारे जमीन हडपण्याचा प्रयत्न

। जेएनपीटी । वार्ताहर ।

वाढत्या औद्योगिकीकरणमुळे आज उरण तालुक्यात जमिनीच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. त्यातच शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोलाने विकायचा घाट एजंटमार्फत होत आहे. उरणच्या माजी तहसीलदार मॅडमने बनावट सात बारा बनवून एका विकासकाला सुमारे दोन कोटींना चुना लावल्याचा प्रकार नुकताच झाला असताना, काही जमीन एजंट बनावट सिक्युरिटी बॉण्ड पेपरद्वारे चक्क गरीब शेतकऱ्यांची जमीन हडप करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे प्रकार उघड होत आहेत.

उरण तालुक्यातील विंधणे येथील शेतकरी कृष्णाबाई बाळ्या (ऊर्फ बाबू) नवाळी यांनी सर्व्हे नंबर २३/६२१,२२, २९/१ आणि २६/६ ही मिळकत लल्लूभाई अभयचंद गुजर यांच्याकडून खरेदी खताने विकत घेतलेली जमीन आहे. त्याच जमिनीलगत मोहसीन मं याकूब खोत यांची सर्वे नंबर २३/८ व २०/० या मिळकती होत्या. त्या बाबू (उर्फ बाळ्या) जानू नवाळी यांनी रोख रक्कम देऊन खरेदी केल्या. आजपर्यंत ती जमीन गेली ६० वर्षे कृष्णाबाई बाळ्या (उर्फ बाबू) नवाळी यांच्या ताब्यातच आहे. त्या जमिनीचा ती शेतसारा (शेतावरील कर) भरत आहेत.

परंतु मध्येच जांभुळपाडा येथील सावित्रीबाई शंकर घरत हिने खरेदी खत केलेल्या मिळकतीवर दावा केला. सदर कृष्णाबाईने उरण सिव्हिल कोर्टात केस हरल्यानंतर, तिने अलिबाग कोर्टात अपील नंबर ५०/२००६ मध्ये केला. कृष्णाबाई यांच्याकडे भक्कम पुरावे असूनसुद्धा येथेही त्या केस हरल्या गेल्या. यापुढे कृष्णाबाईने हिम्मत न सोडता, त्यांनी मुंबई हायकोर्टात अपील नंबर ३९४/२०१७ ला केस दाखल केली.

जेव्हा कृष्णाबाई यांचे हायकोर्टचे वकील भरत जोशी यांनी अलिबाग कोर्टाकडून सर्व दस्तऐवज मागितले, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, अलिबाग कोर्टात कृष्णाबाई बाळ्या (उर्फ बाबू) नवाळी यांच्या नावे कोणी गणेश कोळश्या पाटील (मु. विंधणे, खालचापाडा) या इसमाने बनावट सिक्युरिटी बॉण्ड पेपर बनवून, बनावट कागद पत्रे घुसवून या बनावट सिक्युरिटी बॉण्ड पेपरवर तिच्या पतीची खोटी स्वाक्षरी करून साक्षीदार म्हणून दाखवले, यावरून त्याने न्यायालयाची व शासनाची दिशाभूल करत आहे, हे सिद्ध होते.

याबाबत हायकोर्टात केस दाखल असूनसुद्धा या मिळकती जमिनी मिळवण्यासाठी तो गणेश कोळश्या पाटील व अविनाश रामकृष्ण पाटील व त्याचा भाऊ प्रशांत या गावगुंड एजंटकडून साम, दाम, दंड, भेद या नीतीचा अवलंब करून कृष्णाबाई यांच्या परिवाराला वारंवार शिवीगाळी, धमकावणे, दमदाटी करून या जागेत अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. याबाबत या गावागुंड एजंट विरुद्ध तक्रार चिरनेर पोलीस ठाणे व उरण पोलीस ठाण्यामध्ये रीतसर नोंद केली आहे. शेवटी, कृष्णाबाईंना न्याय मिळावा म्हणून उरण सिव्हिल कोर्टात त्यांनी अपील नंबर ४८/२०२१ मध्ये दाखल केली असून, ते आता न्याय मिळण्याच्या प्रतीक्षेत आहेत.

> उरण तालुक्यात असे प्रकार होत असतील तर ते नक्कीच गंभीर आहे. शेतकऱ्यांनी तक्रार केली तर त्याची शहानिशा करून संबंधित एजंट लोकांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. तत्पूर्वी, शेतकऱ्यांनीही बोगस एजंट्सच्या भूलथापांना बळी पडू नये.
> – भाऊसाहेब अंधारे, तहसीलदार, उरण

> गरीब शेतकऱ्याच्या जमिनी बनावट कागदपत्रे बनवून परस्पर विकल्या जात असतील तर हा प्रकार अत्यंत घातक आहे. याबाबत शासनाने सविस्तर माहिती घेऊन शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन शेतकऱ्यांना फसविणाऱ्या व बनावट कागदपत्रे दाखल करणाऱ्या समाजविघातक एजंटविरुद्ध कडक कारवाई करून गरीब शेतकऱ्यांना योग्य तो न्याय मिळवून द्यावा.
> – ॲड. भरत जोशी, हायकोर्ट

महत्त्वाचे

आईसह मुले बेपत्ता

। पनवेल । वार्ताहर ।

आईसह दोन मुले बेपत्ता झाल्याची घटना पनवेल शहरात घडली असून, याबाबत त्यांच्या नातेवाईकांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. जैबुनीसा नुरद्दीन सयद नालबंद (३० रा.कच्छी मोहल्ला, पनवेल), उंची १५५ सेमी, बांधा मध्यम, रंग गोरा, केस लांब, चेहरा गोल, नाक सरळ असून अंगात पंजाबी ड्रेस, सोबत मोबाईल फोन आहे. त्याचबरोबर मुलगा शोएब उंची १६० सेमी बांधा सडपातळ, रंग सावळा, केस बारीक, चेहरा गोल, नाक सरळ असून अंगात पॅन्ट व शर्ट आहे. तर मुलगी सबा उंची १४५ सेमी, बांधा मध्यम, रंग सावळा, केस आखूड, चेहरा उभट, नाक सरळ लहान असून, अंगात जिन्स पॅन्ट व टी-शर्ट घातले आहे. ते तिघेही राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेले आहेत. यांच्याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पो.हवा. एस.एम. थोरात मोबा नं. ८८९८९५८५४० येथे संपर्क साधावा.

पूरग्रस्तांना मदत

। पनवेल । वार्ताहर ।

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या पनवेलसह नवी मुंबई, मुंबई परिसरात नेहमीच मदत करणाऱ्या केएन फाऊंडेशन व संवेदना चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापिक अध्यक्षा कोमल खोचरे (तावरे) यांनी त्यांच्या फाऊंडेशनतर्फे मोठ्या प्रमाणात आतापर्यंत पूरग्रस्तांना मदत केली आहे. जीवनावश्यक वस्तू, औषधे, कपडे तसेच घरगुती साहित्य याचे वाटप केएन फाऊंडेशन व संवेदना चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

तिसऱ्या लाटेस तोंड देण्यास सज्ज

। पनवेल । वार्ताहर ।

कोव्हिडचीदुसरीलाटआटोक्यात येत असली तरी तज्ज्ञांनी कोव्हिडची तिसरी लाट येण्याचे भाकित केले आहे. याच पार्श्वभूमीवर आयुक्त गणेश देशमुख यांनी वैद्यकीय आरोग्य विभागाची आढावा बैठक घेतली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. पहिल्या व दुसऱ्या लाटेतील ऑक्सिजन तुटवडा लक्षात घेता तिसऱ्या लाटेमध्ये ऑक्सिजनचा पुरवठा कमी पडू नये यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन केले.

रसायनीत पर्यावरण संवर्धनासाठी विविध वृक्षांची लागवड

रसायनी रागाज मित्र मंडळाचा पुढाकार

। रसायनी । वार्ताहर ।

वातावरणात सातत्याने वाढ होत असल्याने अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे. पुरांचे लोंढे जनजीवन विस्कळीत करत आहेत, वातावरणात सातत्याने बदल होत असल्याने रोगराईचे प्रमाणही वाढत आहे. या सर्व बाबींचा विचार करता, पर्यावरण पुरस्कार विजेते, महाराष्ट्र आयकॉन- २०२१ मानकरी, केंद्रीय रेल्वे सल्लागार अभिजित पाटील यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाने रसायनीमधील रसायनी रागा'ज मित्र मंडळाकडून आई डे केअर पेण या दिव्यांग मुलांच्या हॉस्टेल सभोवताली अनेक फळझाडांची लागवड करण्यात आली.

आई डे केयर संस्थेच्या अध्यक्ष स्वाती मोहिते यांनी दिलेल्या हाकेला साथ देत हा कार्यक्रम करण्यात आला. अभिजित पाटील यांनी आपले मत व्यक्त करताना पर्यावरण संवर्धन याबद्दल समाजाची मानसिकता ही संवेदनशील असावी असे म्हणाले. यापुढेही पुढील वर्षात संपूर्ण महाराष्ट्रात वृक्षारोपण लागवडीसाठी आपले मोलाचे योगदान राहील, अशी ग्वाही दिली.

मोहोपाड्यात एकाला २२ लाखांचा गंडा

फेसबुक मैत्रीतून फसवणूक

। रसायनी । वार्ताहर ।

मोहोपाडा श्रावण सोसायटी येथील हेमंत विठ्ठल पालव (५२) यांना मॉरिअम ब्रिजेड हिने फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून त्यानंतर फेसबूक व तिचे व्हॉट्सअप नंबर +४४७४१८३४१९०६ द्वारे हेमंतसोबत मेसेज करुन त्याला विश्वासात घेतले. यावेळी हेमंत व मॉरिअम ब्रिजेड या दोघांत फेसबुकवरुन मैत्री झाली. या मैत्रीतून २२ लाखांचा गंडा घातला आहे.

दरम्यान, मॉरिअम ब्रिजेड हिने हेमंतला यूके येथून पार्सल कुरिअरद्वारे पाठवून त्यामध्ये ५० हजार पाऊंडची रक्कम व गिफ्ट असल्याचे आमिष दाखवून हेमंत पालव यांना रॉयल बॅंक ऑफ स्कॉटलॅंडचे अधिकारी असल्याचे नाव सांगून मोबाईलधारक दिल्ली येथील कस्टम अधिकारी सुनिता हिने तिचे मोबाईलवरुन कोरोनाग्रस्तांकरिता मदत पाठविते, असे सांगितले. यात हेमंत यांनी टप्प्या-टप्प्याने ऑनलाईन रक्कम पाठवून एकूण २१ लाख ८५ हजार २०० रुपयांची ऑनलाईन फसवणूक केली. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात मॉरिअम ब्रिजेड व अन्य दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

शेकापच्या वर्धापनदिनी रक्तदान शिबिराचे आयोजन

। पेण । वार्ताहर ।

शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून जि.प.चे माजी सभापती स्व. प्रमोद (पिंट्याशेठ) पाटील यांच्या स्मरणार्थ पेण शेकापतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. हे शिबीर सोमवार, दि.२ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २.३० या दरम्यान शेकाप कार्यालय, पेण येथे होणार आहे. या शिबिरामध्ये कार्यकर्त्यांनी सहभाग घेऊन स्व. पिंट्याशेठ यांना श्रद्धांजली वाहायची आहे, असे आवाहन शेकाप लाल ब्रिगेटचे तालुकाध्यक्ष स्वप्निल म्हात्रे यांनी केले आहे.

शुभ्रा प्रकल्पाकडून धान्याचे वाटप

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यात मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसाने कर्जत तालुक्यातील उमरोली आदिवासीवाडी येथे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या आदिवासींना मदत म्हणून मुंबईतील शुभ्रा प्रकल्प यांच्याकडून धान्य वाटप करण्यात आले.

मुसळधार पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. राज्यभरात अनेक गावांमध्ये पावसाने दरड कोसळून अनेकांचे संसार मातीमोल झाले आहेत. उमरोली आदिवासीवाडीतील आदिवासी बांधवांच्या घरातील सामानाची नासधूस झाली आहे. शुभ्रा प्रकल्पाच्या वतीने स्थानिक ग्रामस्थ रोहिदास पवार यांनी केलेल्या मागणीनुसार उमरोली आदिवासीवाडी येथे रेशन वाटप करण्यात आले. यावेळी प्रकल्प प्रमुख भाग्यश्री वर्तक, ग्रामपंचायत सदस्य भास्कर लोंगले, ज्ञानेश्वर साळोखे, रोहिदास पवार, पांडुरंग मुकणे आदी मान्यवर उपस्थित होते.

आदिवासी बांधवांना खावटीचे वाटप

। खांब-रोहा । वार्ताहर ।

राज्य शासनाच्या आदिवासी विभागाच्यामार्फत व एकात्मिक आदिवासी विकास कार्यालय पेण यांच्या वतीने रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत मेढा येथील आदिवासीवाडीमेढा,आदिवासीवाडी रेवोली बांधव लाभार्थींना खावटीचे वाटप रोहा पंचायत समितीचे माजी सभापती लक्ष्मण महाले, ग्रामपंचयातीचे उपसरपंच उदय मोरे, मेढा हायस्कूलचे चेअरमन भगवान गोवर्धने, पेणचे प्रकल्प अधिकारी भानुशाली, तालुका निरीक्षक फसाले यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच लाभार्थींच्या खात्यामध्ये २०००/- रक्कम जमा करण्यात आली.

मेढे येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमला प्रकल्प अधिकारी भानुशाली, माजी सरपंच विलास उंबरे, ग्रामपंचायत सदस्य नम्रता महाले, शेवंती शिद, माजी उपसरपंच दिनेश घरट, तालुका अधिकारी फसाले, गायकवाड, पाटील, ए.स. सोडेकर, पी.के. पाटील, मोर्ले, पी.डी. मोरे, प्रशांत महाले, प्रीती खांडेकर, पोलीस पाटील हरिश्चंद्र घरट, भिसे तंटामुक्त अध्यक्ष हरिश्चंद्र ठमके उपस्थित होते. तर, मेढे ग्रा.पं. हद्दीतील रेवोली येथील ३७ लाभार्थी व मेढा येथील ३४ लाभार्थींना खावटी वाटप करण्यात आले.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Work from home 7559374031.
- प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा–गणेश महाकाळ– ८८८८९३५७७५
- Shivraj cable & Internet Services
  Urgent Required Office girl.
  minimum qualifaication 12 th pass with basic computer knowledge [payskill according to self skill]
  contact: Arpita Kawaji 8575552288
  Time: 11 A.m to 6.00 P.m.
- दिशा लॅब अलिबागमध्ये काम करण्यासाठी फुल टाईम मावशी व बॉय हवेत. संपर्क लॅब– ८४११९५३३७४.
- अलिबागमध्ये एस.टी. स्टॅन्डपासून ४ मिनिटांच्या अंतरावर 1BHK फर्निचरसह विकणे आहे. संपर्क – ९९२१५५३७७३
- कुकूचकू पोल्ट्री फार्म प्रा.लि.ला., पाबळ, पेण येथे चिकन प्रोसेसिंग प्लॅन्ट करीता LMV-TR परवानाधारक ड्रायव्हर पाहिजेत. जागा २, पगार १८,०००, २२,००० संपर्क:– श्रेयस पाथरे– ०७७९८८९६४६
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शिघ्र निवारण, मंगलदोष, व्यापार, वृद्धी प्रेम, समस्या गृहक्लेश, अलिबाग.९९६०४५६९८६,८८०६४७९१७३
- भुंड्या पुलाजवळ नदीलगत २४ गुंठे जागा विकणे आहे. संपर्क:–९०२८००३६१३/९५२७३९५१११५
- तरणखोप येथील २० गुंठे जागा विकणे आहे. संपर्क:–९०२८००३६१३/९५२७३९५१११५

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात हवा संविधान स्तंभ!

राजशिष्टाचार विभागाकडून जिल्हाधिकाऱ्यांना पत्र | सचिन गायकवाड यांच्या मागणीची दखल

। पनवेल । वार्ताहर ।

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताची ही घटना तयार केली. यातून प्रत्येक भारतीयाला मूलभूत अधिकार आणि हक्क मिळाले. याची माहिती पुढील पिढीलाही व्हावी असे त्याचे महत्त्व समजावे यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात संविधान स्तंभ उभारण्यात यावा, अशा प्रकारची मागणी कामोठे येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन गायकवाड यांनी राज्य सरकारकडे केली होती.

त्यानुसार प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयाला राज्याच्या राजशिष्टाचार विभागाने पत्र देऊन याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शासकीय-निमशासकीय जागेवर हे स्तंभ उभारण्यात यावे, असेही सूचित केले आहे.भारतीय संविधान नवीन पिढीला माहिती व्हावी. त्याची ओळख व्हावी आणि त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे, एकात्मता, बंधुभाव आणि समानतेचे मूल्य तरुण पिढीमध्ये रुजावेत यासाठी राज्याच्या प्रत्येक तालुक्यामध्ये संविधान स्तंभ उभारण्यात यावेत, अशी मागणी सचिन गायकवाड यांनी केली होती.

त्यांनी यासंदर्भात राज्याच्या राजशिष्टाचार विभागाकडे पाठपुरावासुद्धा केला. त्यानुसार या विभागाने प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयाला पत्र पाठवून शासकीय-निमशासकीय जागेवर अशा प्रकारचे संविधान स्तंभ उभारण्याबाबत सूचित केले आहे.

पार्थ पवार फाऊंडेशनतर्फे 'एक हात मदतीचा'

। कर्जत । वार्ताहर ।

तालुक्यात २१ जुलै रोजी आलेल्या महापुरात आपलं सर्वस्व गमावलेल्या नागरिकांना मदतीचा हात देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार सुरेश लाड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी केलेल्या सूचनेनुसार पार्थ पवार फाऊंडेशनच्या वतीने पूरग्रस्तांना मदत म्हणून संसारोपयोगी वस्तू व किराणा सामान वाटप करण्यात आले.

यावेळी कर्जत तालुका व शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने माजी आमदार सुरेश लाड, रायगड जिल्हा निरीक्षक ॲड. रूपाली दाभाडे, महिलाध्यक्षा ॲड. रंजना धुळे, पूजा सुर्वे, पुष्पा दगडे, शरद लाड, राजेश लाड आदी उपस्थित होते.

रायगडात बहरणार 'ड्रॅगन फ्रूट'ची शेती

फलोत्पादन योजनेंतर्गत मिळणार लागवडीसाठी सुविधा | जिल्हा कृषी अधीक्षकांची माहिती

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

निसर्गाच्या लहरीपणामुळे दरवर्षी येथील शेतीला; पर्यायाने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. त्यामुळे मेहनतही वाया जात आहे. याचाच विचार करुन कमी श्रमात अधिक उत्पादन देणाऱ्या ड्रॅगन फ्रूटची लागवड शेतकऱ्यांनी करावी, असे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक उज्ज्वला बाणखेले यांनी केले आहे.

'ड्रॅगन फ्रूट' हे फळपीक अत्यंत कमी पाण्यावर पिकते. खाण्यासाठी पौष्टिक असल्यामुळे या फळाला जगाच्या बाजारात मोठी मागणी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी ड्रॅगन फ्रूट हे फळपीक 'आर्थिक वरदान' ठरणारे असल्यामुळे शेतकऱ्यांनी हे फळपीक घेण्याचे आवाहन बाणखेले यांनी केले. फलोत्पादन योजनेंतर्गत ड्रॅगनफ्रूट लागवडीसाठी अधिकाधिक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टल mahadbtmahait.gov.in वर फलोत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक उज्ज्वला बाणखेले यांनी केले आहे.

लागवड कशी करावी?

ड्रॅगनफ्रूट फळपिकाची लागवड करण्यासाठी जमिनीची पूर्व मशागत झाल्यावर दोन झाडांमध्ये ३ मी. X ३ मी. X २५ मी. या अंतरावर खड्डे खोदून खड्ड्याच्या मधोमध सिमेंट काँक्रिटचा किमान ६ फूट उंचीचा खांब व त्यावर काँक्रिटची फ्रेम बसविण्यात यावी. या सिमेंट काँक्रीट खांबाच्या एका बाजूला एक याप्रमाणे चार बाजूला चार रोपे लावावीत.

अनुदान किती?

ड्रॅगनफ्रूट फळपिकाची लागवड करण्यासाठी लागवड साहित्य, आधार पध्दत, ठिबक सिंचन, खते व पिक संरक्षण याकरीता अनुदान देय आहे. याकरीता रक्कम रु. ४.०० लाख प्रकल्प मूल्य ग्राह्य धरुन ४० टक्के प्रमाणे रक्कम रु १ लाख ६० हजार इतके अनुदान तीन वर्षात ६०:२०:२० या प्रमाणात देय आहे. दुसऱ्या वर्षी ७५ टक्के व तिसऱ्या वर्षी ९० टक्के झाडे जिवंत असणे अनिवार्य आहे.

> ड्रॅगनफ्रूट लागवडीसाठी अधिकाधिक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टल mahadbtmahait.gov.in वर फलोत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत, तसेच अधिक माहितीसाठी संबंधित नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.
> – उज्ज्वला बाणखेले, जिल्हा कृषी अधीक्षक

ड्रॅगनफ्रूट (कमलम) हे एक निवडुंग परिवारातील अत्यंत महत्त्वपूर्ण फळ आहे. ड्रॅगनफ्रूट या फळामध्ये अधिक प्रमाणात उपलब्ध असणारे पोषक तत्त्व आणि ॲन्टीऑक्सीडेन्टमुळे या फळास सुपर फ्रूट म्हणून प्रसिद्धी मिळत आहे. या फळाचे क्षेत्र, मागणी निर्यात क्षमता, औषधी व पोषक मूल्य इ. बाबी लक्षात घेऊन सन २०२१-२२ या वर्षापासून एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातून ड्रॅगनफ्रूट लागवडीसाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

कै. सौ. सुनिता चंद्रकांत शेट, यांच्या स्मरणार्थ, अलिबाग

संपादकीय

अंधार दूर व्हावा

जीवन सुरळीत चालले आहे याची अनुभूती येण्यासाठी घरात वीज असावी लागते, इतके आपले आयुष्य विजेच्या असण्यावर अवलंबून आहे. घरातील अनेक उपकरणे विजेवर चालतात आणि ती नसली की ती कुचकामी ठरतात. काळोख पडल्यावर येणारा आंधळेपणा दिव्याच्या प्रकाशामुळे दूर होतो, त्यामुळे दिवा लागणे दिलासादायक असते. मात्र हीच वीज काही परिस्थितीमध्ये जीवघेणीही होऊ शकते. विशेषतः पाण्याच्या संपर्कात आल्यानंतर ती सगळा ओला परिसर आपल्या शक्तीने भारते आणि एरव्ही अत्यंत उपयुक्त असलेली हीच वीजशक्ती अत्यंत धोकादायक बनते. पावसाच्या मुसळधार धारांनी मानवी वस्तीभोवती पहारे उभी केल्यावर, ही पाण्याची तटबंदी विजेच्या संपर्कात येण्याचा मोठा धोका असतो. त्यामुळे ती खंडित करण्याचा निर्णय जिवीतहानी रोखण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. परंतु काही वेळा परिस्थिती अशी बनते की, इच्छेनुसार ती बंद करता येत नाही आणि गरज वाटेल तशी सुरूही करता येत नाही. रायगड, कोंकण भागांत गेली दोन वर्षे आलेल्या वादळाच्या काळात हे जसे दिसले तसेच सध्या पुराच्या वेढ्यात सापडलेल्या प्रदेशांच्या बाबतीत देखील दिसून येत आहे. गेल्या आठवड्यात, २२ जुलैपासून रायगड जिल्ह्यातील काही तालुक्यांना महापुराचा जोरदार फटका बसला. अतिवृष्टी आणि त्यामुळे आलेला पूर, तसेच काही ठिकाणी झालेले दरड कोसळण्याचे प्रकार यामुळे या तालुक्यांमधील अनेक भागांचा वीज पुरवठा खंडीत झाला. महाड आणि पोलादपूर तालुक्यांना या पावसाचा सर्वाधिक फटका बसला आणि तेथील वीज पुरवठा अद्यापही सुरू झालेला नाही. अर्थात, महावितरणकडून वीज पुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू करण्यात आले असले तरी अद्याप सुमारे दोनशेच्या आसपासच्या गावांतील जवळपास सत्तर हजार रहिवासी अजूनही अंधारात आहेत. अभूतपूर्व अतिवृष्टीतून आलेल्या महापुरामुळे महाड व पोलादपूर तालुक्यातील अडीचशेहून अधिक गावांतील ऐंशी हजारांहून अधिक जणांचा वीज पुरवठा खंडीत झाला होता. पूर ओसरल्यानंतर महावितरणकडून वीज पुरवठा सुरळीत व्हावा यासाठीचे काम हाती घेण्यात आले. राज्यातील विविध भागांतून वीजमंडळाने पथके बोलावली हे कौतुकास्पद आहे. परंतु पूर ओसरून काम सुरू होण्यात बराच काळ गेला. पूर आल्यानंतरही दोन दिवसांहून अधिक काळ पावसाचा जोर कायम राहिल्याने मदतकार्य आरंभण्यास विलंब झाला, हे देखील तितकेच खरे. राज्यातील मंत्र्यांकडून पूरस्थितीची पाहणी सुरू झाल्यानंतर ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनीही विजेची परिस्थिती पाहण्याच्या उद्देशाने या भागांचा दौरा केला होता. गम्मत म्हणजे शरद पवार यांनी दौऱ्यामुळे प्रशासनावर दबाव येऊन ते करत असलेल्या मदतकार्यात अडथळा निर्माण होत असल्याकारणाने दौरे टाळा असा सल्ला दिला, त्या दिवशी ऊर्जामंत्री डॉ. राऊत दौऱ्यावर होते. अर्थात येथील पूरपरिस्थिती अभूतपूर्व होती आणि वीज पुरवठा पूर्ववत करण्याची कार्यवाही मदतकार्यासाठी तसेच पूरग्रस्तांना उमेद देण्यासाठी देखील महत्त्वाची असल्याने त्यांनी त्याचाही आढावा घेतला हे बरे झाले. सौर दिव्यांनी वीज नसलेल्या भागांत प्रकाश निर्माण करण्याची त्यांनी घोषणाही केली. सौरऊर्जेकडे अनेक अर्थाने महत्त्वाचा पर्याय म्हणून पाहिला जात असला तरी निदान काही काळासाठी रायगड, कोंकण भागासाठी तो किती भरवशाचा पर्याय आहे हे तपासून पाहायला हवे. कारण तीन महिने तरी या भागांत भरपूर पाऊस पडतो आणि आकाशात सूर्याचे दर्शन घडत नाही. उर्वरीत आठ नऊ महिन्यांसाठी तो चांगलाच पर्याय आहे हे निश्चित. मात्र त्यातून केवळ घरात प्रकाश आणि रस्त्यावर प्रकाश निर्माण होतो. बाकी गोष्टींसाठी पारंपरिक विजेवरच अवलंबून राहावे लागते. छोटे मोठे उद्योग अद्याप पूर्णपणे सौरऊर्जा प्रणालीवर चालू शकत नाहीत. आता महाड तालुक्यातील दोन अतिउच्चदाब वाहिन्यांचे टॉवर पुरामुळे कोसळले. परिणामी चार उपकेंद्रांत बिघाड झाला. त्याच्या दुरुस्तीत प्रगती होत असली तरी टॉवर उभे राहीपर्यंत वेळ लागेल आणि त्याला कोणताही अन्य पर्याय नाही. सरकारी आकडेवारीनुसार या भागांत उच्चदाब असलेले ८८ खांब उखडले गेले होते, त्यातील २० खांब पुन्हा उभारण्यात आले आहेत. या विजेवर स्थानिक रुग्णालये आणि आता कोरोनाचा अटकाव करण्यासाठी सुरू असलेल्या लसीकरणाची प्रक्रिया या सगळ्यांवरच त्याचा परिणाम झालेला आहे. विजेची दुखणी अनेक आहेत आणि त्याच्या पुनर्उभारणीसाठी लागणारा निधीही प्रचंड आहे. मात्र सातत्याने या पायाभूत सुविधेकडे पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही. त्यातूनही हा पुरामुळे निर्माण झालेला अंधार दूर व्हायला वेळ लागत आहे.

संजय टाकळगव्हाणकर

शिक्षण व्यवस्थेतील स्थित्यंतरे

शिक्षण हे समाज व राष्ट्रनिर्मितीचे केंद्र आहे याचे सोयरसुतक राज्यकर्त्यांना, नोकरशाहींना व शिक्षकांना न राहिल्याने दर्जेदार व गुणवत्तापूर्वक शिक्षणाच्या मृगजाळ्याकडे म्हणजेचं खाजगी संस्था व कोचिंग क्लासेसकडे समाज धावतांना दिसत आहे. समाजासाठी ही शैक्षणिक व्यवस्था निर्माण करुन याचं शिक्षण व्यवस्थेतील सर्वघटकांनी अर्थप्राप्तीसाठी शिक्षणांचे रुपांतरण धंद्यात केले. त्यामुळे एकेकाळच्या समानतेच्या शिक्षणाला छेद देवून शिक्षण व्यवस्थेत विषमतावादी व चातुर्वर्ण्य शिक्षण व्यवस्था अस्तित्वात आली आहे. गुणवत्ता व दर्जेदार शिक्षणाच्या नावाखाली मध्यम व निम्न मध्यमवर्गीयांनी शासकीय व शासन अनुदानित शाळेतून आपल्या मुलांना काढण्यास सुरुवात केली. भारताच्या डीआयएसईच्या २०२० च्या अहवालानुसार १९९८ पासून खाजगी शाळेतील मुलांचा आलेख हा सातत्याने वाढत गेला १९७८ मध्ये ३.४ टक्के विद्यार्थी ही खाजगी शाळेत होती. २०१९ मध्ये ४९.५ इतके विद्यार्थी खाजगी शाळेत वाढत गेले. आजमितीस देशातील अर्धे विद्यार्थी म्हणजे सुमारे १२ कोटी विद्यार्थी खाजगी शाळेत शिक्षण घेत आहे. त्यासाठी पालकवर्ग १० हजार ते ३ लाख इतका वार्षिक खर्च करतो. उर्वरित १२ कोटी मुले शासकीय व शासन अनुदानित शाळेत शिक्षण घेतात. एका विद्यार्थ्यांमागे शासनास सरासरी वार्षिक ३६ ते ४० हजार रुपये खर्च येतो. यात विद्यार्थ्यांना मिळणार्या सवलती, शाळेच्या भौतिक सुविधासह शिक्षकाच्या पगाराचा समावेश आहे. खाजगी शाळेत आपली मुले पाठवणारे ७३ टक्के पालक हे मध्यम व निम्य मध्यमवर्गीय आहे. त्यामुळे खाजगी शाळेत केवळ श्रीमतांचीचं मुले जातात ही चुकीची भावना या सर्वे क्षणातून दुर झाली. देशातील एकंदरीत शिक्षण पद्धतीत एक सुत्रता आणण्यासाठी केंद्राने नियुक्त केलेल्या एका समितीच्या आढाव्या अनुषंगाने विद्यमान निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत एकेठिकाणी म्हणतात की, खाजगी शिक्षण संस्थेत दर्जेदार शिक्षण गुणवत्ता मिळते ही बाब पूर्णतः सत्य नाही. एकंदरीत बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत यतकिंचितचं फरक पडतो. खाजगी शिक्षण संस्थेतील केवळ ६० टक्के शाळा ह्या दहावीच्या बोर्ड परीक्षा घेण्यास पात्र ठरतात. त्यामुळे सरकारी व खाजगी शाळेतील नावाने जो अपप्रचार केला जातो त्यात अंशतः सत्यता असल्याचे दिसून येते.

शिक्षण : समतावादाकडून पुन्हा नवचातुर्यवर्ण्य केंद्रित विषमतावादाकडे

अलीकडे खाजगी शिक्षण संस्था व शिकवणीचे क्षेत्र हे अत्यंत झपाट्याने वाढले आहे. या क्षेत्रातील वार्षिक उलाढाल १.५ ते २ लक्ष कोटी रुपयाची आहे. यावर शासनाचे पाहिजे तेवढे नियंत्रण नाही. तर दुसरीकडे शासनाच्या शैक्षणीक संस्थांमध्ये कुशल व अपुरे मनुष्यबळाच्या अभावी या शैक्षणिक संस्था काम करत आहेत. या परिस्थितीचा फायदा घेवून जागतिक स्तरावरील ऑनलाईन, डिजीटल कंपन्यांनी या क्षेत्रात कोरोना जागतिक संकटाचे निमित्त समोर करुन उडी घेतली आहे. यासाठी वरील परिस्थिती कारणीभूत आहे. या ठिकाणी विश्वबँक व बिल गेटस या माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील विख्यात व्यक्तीच्या कंपनीने ग्लोबल शिक्षण नितीच्या मार्फत ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून जगातील सर्व शिक्षण एका डिजीटल

प्लॅटफार्मवर आणण्याची योजना आखली आहे. शिक्षण क्षेत्र जगातील आर्थिक उत्पनाचे तीसरे क्रमांकाचे क्षेत्र असल्याने यावर ऑनलाईन कंपनीचा डोळा पूर्वीपासूनच आहे. आंतरराष्ट्रीय बायजू या ऑनलाईन कंपनीने काही महिन्यापूर्वीचं भारतातील 'आकाश' ही खाजगी संस्था ७२ हजार कोटी रुपयात विकत घेतली आहे.यावरून शिक्षण क्षेत्रावर ह्या बडया कंपन्या कसा कब्जा करीत आहे याचे हे उदाहरण आहे. ऑनलाईन कंपन्या आपल्या आर्थिक साम्राज्याच्या जोरावर जगातील शासनकर्त्यांवर दबाव आणून गेल्या अनेक दशकापासून सर्वसामान्यांच्या शिक्षणासाठी अस्तित्वात आलेल्या शैक्षणिक संस्था बंद पाडून ऑनलाईन शिक्षण व्यवस्था जगावर लादण्याचा डाव साधत आहे. त्यास शासनकर्ते या दबावास बळी पडत असल्याचे पहावयास मिळत आहे. पण हे सर्व होत असतांना शिक्षण क्षेत्रातील शिक्षकवर्ग, संस्था चालक, पालक मात्र याकडे निमुटपणे पहात आहेत. ही शोकांतिका आहे. भारतावर जेव्हा जेव्हा परदेशी आक्रमन झाले त्या वेळी देशातील राजेशाही आपल्या ऐश आरामात मशगुल होती. आज शिक्षण क्षेत्रात आक्रमण होत असतांना शिक्षण क्षेत्रातील शिक्षक मंडळी, पालकवर्ग हे सर्व निमुटपणे पाहत आहे. एकेकाळी मुंबई हे कापड गिरण्याच्या माध्यमातून भारताचे एक आर्थिक केंद्र होते. कालांतराने गिरणी मालक व कामगार यांच्यातील संघर्ष वाढला. गिरण्या बंद पडल्या. लाखो कामगार बेरोजगार झाले. देशोधडीला लागले. यातून गरीबी, गरीबीतून अवैध व्यवसाय व गँगस्टर संस्कृतीचा उदय झाला. यात हजारो कामगारांच्या संसाराची राख रांगोळी झाली. आज बहुजनांसाठी निर्माण झालेल्या शिक्षणव्यवस्थाही अशाचं वळणावर येवून ठेपली असतांना ना शिक्षणसंस्थेला, ना शिक्षकाला, ना पालकाला त्यांची चिंता आहे. शिक्षणात, रोजगार अभावी भरकटत असलेला तरुण आता कोणत्या मार्गाने जाणार आहे हे कोरोना पर्वानंतर आपणास कळेल.

(लेखक हे मुख्याध्यापक असून राजकीय व सामाजिक घडामोडीचे अभ्यासक आहेत)
९८२२७३४२८१
(उत्तरार्ध)

वाचनीय

खरेदी

मुलीसाठी लग्नाचे कपडे काढतांना वडिलांसोबत घडले असे काही की पाहून तुम्हाला धक्काच बसेल...

मुलीच्या लग्नासाठी काढलेल्या कपड्यांचे बिल, बजेटपेक्षा ५ हजारांनी वाढले मग पहा वडिलांची काय अवस्था झाली...

डोळे दिपून जावेत असे सगळे रंग, प्रत्येकाला गोंधळून टाकणारे, नवरी तर जास्त गोंधळली ही गुलबक्षीपैठणी घेऊ का? चिंतामणीरंगाची का हिरवीगार घ्यावी,? सोबत आलेल्यांचे वेगवेगळे चॉईस, मध्येच सोबत आलेल्या पण अजुन फारशी ओळखही झाली नसली तरी त्याचा चॉईस विचारायला तिचा नवरदेवाकडे तिरपा कटाक्ष.. आरश्यात बघताना हळूच टाकलेला.

त्याच डोळ्यांनीच तिला खुणावलेलं उत्तर ही नको,.. ही जांभळी सुंदर,.. त्याच्या अश्या सांगण्यानेही ती मोहरून स्वतःला नसेल पटली तरी ओके हीच घेऊ जांभळी असं म्हणत आरश्यापासून वळली, मोठी ताई म्हणाली, अग तुला चिंतामणीच घ्यायची होती ना, त्यावर अडखळत तिचं उत्तर, हो अग पण जांभळा युनिक वाटतो ना,. ते उत्तरही त्याच्याकडे बघुन एक नवं फुलणारं नातं ताईच्याही लक्षात आलं,.. हं घ्या घ्या जांभळी घ्या आम्हाला काय म्हणत दोघी बहिणींनी एकमेकींना टाळ्या दिल्या.. प्रत्येकजण साडीवर हात फिरवून स्पर्श सुख त्या रेशीमधाग्याचं अनुभवत होता, आणखी बाकीच्या साड्यांची खरेदी झाली.

परवडणारं नसलं तरी बापही लेकीच्या चेहऱ्यावरच सुख बघुन घे तुला आवडेल अशी असं सांगत होता,. आई मात्र मध्येच लेकीचा हात दाबत किमतीचा टॅग दाखवून आता पैठणी झाली मनासारखी, आता कमी किमतीच्या साड्या काढ हे सुचवत होती, तिच्या पाच साड्या झाल्या आणि बापाने रुमाल काढून घाम पुसला,.. पहिली पैठणी आणि त्यानंतर घेतलेल्या साड्याचे टॅग मनात हिशोब करत नाचत होते त्याच्या समोर, आता बाकीच्या दोन लेकींसाठी साड्या घ्यायच्या तर त्यांच्या सासवा देखील वाकुन बघत होत्या आपल्या सुना कश्या साड्या काढतात ते,..? पण या दोघी तर बापाची परिस्थिती पक्की ओळखून होत्या.

साधारण साड्या घेत त्या बाजूला झाल्या,.. बाकी इतरही बऱ्याच साड्या खरेदी झाली,.. जेन्ट्सचे कपडा सेक्शन तिकडे आहे म्हणत मध्येच अर्धे पुरुषमंडळी तिकडे सरकले, शोरूम एसी असलं तरी बाप मात्र सारखा घाम पुसत होता,.. आईने ते हेरलं त्याच्या जवळ जात कानात हळूच ती कुजबुजली,.. अहो फार काळजी घेऊ नका,.. सगळा हिशोब झाल्यावर माझ्या साडीचा विचार करू,.. बाप डोळ्यात दाटून आलेलं पाणी तिला लक्षात येणार नाही असं पुसत म्हणाला,.. बघू ग आताच नको ठरवू काही,.. पुरुष मंडळी खरेदी करून आली सुद्धा तरी ह्या बायका अजून साडीतच रमलेल्या, एका हिरव्यागार मोठ्या काठच्या.

(क्रमशः)
स्वप्ना मुळे

भारत रांजणकर

रस्ते पूल सांधण्याची गरज

रायगड जिल्ह्यात २१ आणि २२ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील तब्बल आठ रस्ते आणि पाच पूलांवरील वाहतूक ठप्प झाल्याने अर्ध्या जिल्ह्यातील दळणवळण ठप्प झाले आहे. मोठे व्यवसायिक नुकसान झाले नसले तरी ग्रामीण जनतेचे मात्र मोठे हाल होत आहेत. यापैकी सहा रस्ते महाड आणि पोलादपूर तालुक्यातील आहेत. त्यामुळे अनेक पुराचा फटका बसलेल्या अनेक गावे, वाडी वस्त्यांपर्यंत पोहचून मदत करण्यात अडथळे येत आहेत. त्यामुळे राज्य सरकारने युद्धपातळीवर निधी उपलब्ध करुन देत तात्काळ हे रस्ते प्राधान्याने आणि पुल दुरुस्त करुन वाहतूक पूर्ववत करुन देणे गरजेचे आहे. दक्षिण रायगडमधील महाड, पोलादपूर तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पूर परिस्थिती निर्माण झालेली असल्याने बाधित शहरांमध्ये व गावांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले. मोठ्या प्रमाणावर मालमत्तांचे नुकसान झालेले आहे. रस्त्यांचेही तसेच पुलांचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पर्यायी रस्ता नसलेले व बंद पडलेले रस्त्यांमध्ये महाड तालुक्यातील बिरवाडी वाळण तर पोलादपूर तालुक्यातील महाबळेश्वर रस्ता, बोरज उमरठ रस्ता, भोराव सवाद रस्ता, क्षेत्रफळ कुडपण रस्ता, तसेच साखर तळ्याचीवाडी रस्ता या रस्त्यांचा समावेश आहे. तसेच पर्यायी रस्ता असलेले व बंद पडलेले रस्त्यांमध्ये अलिबाग मुरुड रस्ता, चरई रानवडे रस्ता यांचा समावेश आहे. तसेच वाहतूक खंडीत झालेल्या पूलांमध्ये अलिबाग मुरुड मार्गावरील काशिद पूल, महाड-बिरवाडी पूल, पोलादपूर-चरई पूल, पोलादपूर-उमरठ पूल, श्रीवर्धन-तोराडी पूल या पाच पूलांचा समावेश आहे. या रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत जिल्हा प्रशासनाने आवाहन करीत फक्त माहिती प्रसिद्धी साठी दिली आहे. मात्र या रस्त्यांचे तसेच पुलांचे काम कधीपर्यंत पूर्ण होईल याची कोणतीच माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेली नाही. काशिद पुल दुर्घटनेनंतर शेकापक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी तात्काळ मुख्यमंत्र्यांसोबत तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांसोबत चर्चा करुन सदर पुलाचे काम सुरु करण्यास भाग पाडले. आज जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर रस्ते आणि पुल नादुरुस्त झालेले असल्याने त्याची दुरुस्ती करण्यासाठी आवाज

खारा-वारा

उठविण्याची गरज आहे. हे रस्ते ग्रामीण जनतेचा शहरासोबतचा दुवा आहे. त्यांना येथून पायी ये-जा करणे शक्य असले तरी वैद्यकीय आपत्ती काळात याची मोठी गैरसोय समोर येऊ शकते. त्यामुळे शासनाने प्राधान्याने याचा विचार करुन तात्काळ निधी उपलब्ध करुन देत युद्ध पातळीवर हे रस्ते पुर्ववत सुरु करण्याची खरी गरज आहे.

ऊर्जामंत्र्यांचा दिलासा

पूरग्रस्त भागातील विज ग्राहकांकडून विज बिल वसूली थांबविण्याचे राज्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांचे आदेश दिलासादायक आहेत. शेतकरी कामगार पक्षाने यासाठी सर्वप्रथम आवाज उठवित राज्य शासनाचे लक्ष वेधून घेतले होते.

लॉकडाऊनंतरपूरपरिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या जनतेकडे कुठलीही दया माया न दाखवता महावितरण कंपनीने सक्तीने विज वसूली सुरु केली होती. अगदी महिनाभराच्या विज बिलासाठी ग्राहकांना विज पुरवठा तोडण्याचे आदेश देण्यात आले होते. या प्रकारामुळे जनतेत दहशतीचे वातावरण होते. लॉकडाऊनमधून सावरत असतानाच ही सक्ती सुरु करण्यात आल्याने जनता हवालदिल झाली होती.

नेहमी जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरणाऱ्या शेकापक्षाने जनतेच्या या प्रश्नासाठी देखील सर्वप्रथम आवाज उठविला. शेकाप नेते पंडीत पाटील यांनी या सक्तीच्या वीज बिल वसुलीविरोधात आक्रमक होत ही वसुली थांबविण्याची मागणी केली होती. याच मागणीची दखल घेत पूरग्रस्त भागात वीज बिल वसुली न करण्याचे आदेश ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी महावितरण कंपनीला दिले.

पूरग्रस्त भागात वीज बिलवसुली करु, नये असे त्यांनी आदेश दिले. या ठिकाणी वसुली होणार नाही. परिस्थिती पूर्ववत होत नाही तोवर वीजबिलंदेखील दिली जाणार नसल्याचा निर्णय देखील घेण्यात आला. लोकांचे खूप मोठें नुकसान झाले आहे. परिस्थिती निवळल्यानंतर वीज बिल देत असतानाही कितपत दिलासा देऊ शकतो याचा विचार समिती करत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे उशिरा का होईना ऊर्जामंत्र्यांनी घेतलेला हा निर्णय दिलासादायकच आहे. त्यामुळे जनतेला थोडाफार आधार मिळणार असला तरी भविष्यात पुन्हा बिल आकारताना त्यात व्याज आकारु नये इतकेच सांगावेसे वाटते.

लोकसंसद

विद्यार्थ्यांची जबाबदारी शाळा का टाळतात?

कोरोनामुळे खाजगी आस्थापने, विविध व्यवसाय यांची विस्कटलेली घडी अद्यापही नीट बसलेली नाही. त्यासाठी आणखी किती कालावधी लागेल याची खात्री नाही. खाजगी शाळांच्या शुल्कात होणारी १५ टक्के कपात ही अगदी तुटपुंजी आहे. शुल्क कपात ५० टक्के केली असती तर ते पालकांसाठी खरोखरच दिलासादायक ठरले असते. मुलांना शाळेशिवाय खाजगी शिकवणीलाही पाठवावे लागते. कारण शालेय शिक्षक केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या मागे लागलेले असतात. असे करत त्यांना परीक्षा घ्यायच्या असतात. शाळा घसघशीत शुल्क घेतात. मग विद्यार्थ्यांची पूर्ण जबाबदारी शाळा का टाळतात? विद्यार्थ्यांना खाजगी शिकवणीसाठी वेळ आणि पैसा व्यय करण्याची नामुष्की का येते? याचे उत्तर कोणतीही शाळा देऊ शकलेली नाही. एकाच इयत्तेत शिकण्यासाठी शाळा आणि खाजगी शिकवणी अशा प्रकारे दोन वेळा खर्च होतो. शाळांनी विद्यार्थ्यांची मानसिकता अभ्यासून नीट शिकवले पाहिजे. म्हणजे त्यासाठी चोख वेळापत्रक सिद्ध केले तर विद्यार्थ्यांना अभ्यासाचा मानसिक ताण सहन करावा लागणार

नाही. विद्यार्थ्यांकडून केवळ शुल्क वसुलीसाठी आग्रह धरताना त्यांच्या अभ्यासाची घडी नीट कशी बसेल, याविषयी शाळा आग्रही दिसत नाहीत. एका वर्गातून दुसऱ्या वर्गात जाता यावे यासाठीच केवळ शाळा उरल्या आहेत, असे वाटते. कारण विद्यार्थ्यांचा मूळ अभ्यास खाजगी शिकवणीतच होत असतो. या सर्व धावपळीत विद्यार्थी घडण्यासाठी शाळेचे योगदान काय ? या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. शाळांच्या शुल्कावर भरमसाठ खर्च करूनही ना पालकांना दिलासा आहे ना विद्यार्थ्यांना. तरीही यांचा तोरा कायम आहे. एक शैक्षणिक सत्र संपले की दुसरे चालू झाले. असेच चक्र वर्षानुवर्षे चालू आहे. शाळा आणि विद्यार्थी यांचे मूल्यमापन करणाऱ्यासाठी शासनाकडून शैक्षणिक समिती शाळांना भेट देत असते. या भेटीची फलनिष्पत्ती काय ? विद्यार्थी खाजगी शिकवण्यांच्या बळावरच शैक्षणिक वाटचाल करत आहेत. यात दुमत नाही. शाळांची पायरी चढावी लागणे हा नाईलाज झाला आहे. त्याला जर काही पर्याय मिळाला तर विद्यार्थी आणि पालक सुटकेचा श्वास सोडतील. उच्च शिक्षणाप्रमाणे शालेय शिक्षणही महाग झाले आहे अशी स्थिती आहे. त्यात हा १५ % शुल्क कपातीचा दिलासा आशादायी वाटत नाही.

- जयेश राणे, भांडुप

आपत्कालीन प्रशिक्षण काळाची गरज!

महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर,सातारा जिल्हे आणि कोकणातील बराचसा प्रदेश गेल्या काही दिवसांत अतिवृष्टी, पूर, दरडी कोसळणे यांसारख्या प्रकोपाची झळ सोसत आहे. मागे निसर्ग आणि तौक्ते चक्रीवादळ ही येऊन गेले. मुंबई सारख्या ठिकाणी पावसाळ्यात धोकादायक इमारती पडणे हेही नेहमीचे झाले आहे. या खेपेला जेव्हा सगळीकडे पूरस्थिती उद्भवली तेव्हा छ्ळ्क्र च्या टीम्सना देखील घटनास्थळी पोचण्यात अडचणी आल्या कारण हवाइमार्गाने हवामान खराब असल्याने पोचता येत नव्हते तर रस्ते पूर्ण खचले आणि पाण्याने भरलेले असल्याने प्रवास करता येत नव्हता. अशावेळेस आपत्कालीन प्रशिक्षणाची निकड लक्षात येते. नागरिकांनी आणि महाराष्ट्र शासनाने देखील भावी काळ लक्षात घेऊन आपत्कालीन प्रशिक्षण घेण्याकडे कल वाढवायला हवा. किमान अग्निशमन, प्रथमोपचार प्रशिक्षणाचे काही प्राथमिक धडे शालेय, महाविद्यालयीन अभ्यासक्रमात आणले गेले पाहिजेत. पूर, भूकंप, त्सुनामी, वीज पडणे, दरडी कोसळणे, आगी लागणे यावेळी स्वतःचा आणि इतरांचा जीव वाचवण्यासाठी प्राथमिक स्वरूपाचे आवश्यक ज्ञान शासनाने जनतेस द्यायला हवे. जनतेने देखील इंटरनेट च्या या काळात प्रथमोपचार आणि तत्सम कौशल्य आत्मसात करावे. याविषयी महाराष्ट्र शासन काही तरी विचार करेल अशी अपेक्षा !

- राहुल लोखंडे, नवी मुंबई

विमा कंपन्यांनी पूरग्रस्त शेतकऱ्यांना आधार द्यावा

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे पश्चिम महाराष्ट्रतिल काही जिल्हे, कोकण मधील काही जिल्हे व विदर्भातील काही जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांची खूप मोठी हानी झालेली आहे,पिके वाहून गेली, शेतात पाणी तुंबल्याने पिके गाळ व पाण्यामुळे नष्ट झाली, शेतातील पूर्ण पीक नष्ट झाले आहे. यामुळे शेतकरी दादा मोठ्या अडचणीत सापडला आहे, शेतकऱ्यांच्या या नुकसानीची भरपाई सरकारच्या तुटपुंजा मदतीने भरून निघणार नाही या साठी विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना भरभरून मदत करावी व त्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे रहावे अशी अपेक्षा आहे, विमा कंपन्या जरूर योग्य पाऊल उचलून शेतकरी दादांना आधार देतील अशी अपेक्षा आहे.

- धोंडिरामसिंह राजपूत, औरंगाबाद

चर्चेतला चेहरा

आशावादी डॉक्टर दाम्पत्य

जागतिक महामारी उद्भवली असतानाही सुरुवातीपासूनच न घाबरता न डगमगता दवाखाना चालू ठेवून कोरोनासारख्या रोगावर मात करण्यासाठी सातत्याने लोकांना या आजाराविषयी मार्गदर्शन करून ग्रामीण भागातील कोरोना धारक रुग्णांना धीर देऊन समजावून सांगून आपण यातून नक्कीच बरे होऊ अशी आशा पल्लवित करून डॉक्टर सतीश उत्तमराव पवार व सौ. उर्मिला सतीश पवार या दोघा डॉक्टर दाम्पत्यांनी केलेले कार्य निश्चितच अभिमानास्पद असून त्यांच्या कार्याची प्रशंसा होताना दिसून येते.

पेण तालुक्यातील गडबसारख्या ग्रामीण भागात अनेक आजाराचे रुग्ण दिवसेंदिवस येत असतात. त्यातच ताप आलेले सर्दी खोकला असलेले अनेक रुग्ण रोज येत असत. मात्र आलेल्या सर्वच रुग्णांना आदराची वागणूक देत कोरोनाचे सर्व नियम समजावून सांगून योग्यपणे काळजी घेण्याचे आवाहन सतत दोन वर्षे करत असल्याने आज हजारो रुग्ण बरे होऊन सुखी संसार करत असल्याचे पाहून मनाला समाधान लाभल्याचे दिसत आहे. मागील बत्तीस वर्षांच्या प्रदीर्घ सेवेपेक्षा वेगळा अनुभव पाहायला मिळाला. जमेल तेवढा कोरोना काळात समाजासाठी उपयोग केल्याने खूप चांगले व वाईट अनुभव आले नेहमीपेक्षा वेगळे पेशंट व कोरोनाचे पेशंट यांची विभागणी सावधपणे करून सोमवार ते शनिवार दवाखान्यात सकाळी दहा ते संध्याकाळी सात साडेसात आणि रविवारी सुट्टीच्या दिवशीही घरच्या घरी आलेल्या रुग्णाला सेवा देत आहेत.

संभाव्य अतिवृष्टीबाबत प्रशासनाला केले सतर्क

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर तालुक्यातील २००५ मध्ये दरडग्रस्त झालेल्या गावांबद्दल आढावा घेऊन पालकमंत्री अदिती तटकरे यांनी येत्या काही दिवसात राज्यात होणाऱ्या अतिवृष्टीच्या इशाऱ्याकडे लक्ष वेधत प्रशासनाला सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

पोलादपूर येथील तहसील कार्यालयामध्ये प्रभारी तहसीलदार समीर देसाई, पेणचे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार आणि प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अतिवृष्टी पूरग्रस्त आणि दरडग्रस्त गावांच्या मदत कार्य तसेच रस्ते पुनर्निर्माणाचा आढावा तटकरे यांनी घेतला.

दरडग्रस्त व पुर्नबाधित गावांच्या यादीनुसार पोलादपूर तालुक्यातील गावांमध्ये कोणत्याही प्रकारची आपत्ती आगामी काळात अतिवृष्टीच्या इशाऱ्यानुसार ओढवली जाऊ नये, यासाठी सतर्कता बाळगण्याची खबरदारी घेण्यास यावेळी अदिती तटकरे यांनी सांगितले. साखर सुतारवाडी, केवनाळे येथे दरड कोसळली आणि आंबेमाचीवर दरड कोसळण्यापूर्वी नाणेघोळ येथे ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी हलविले तशा पद्धतीने येत्या काळात कोणत्याही प्रकारची शक्यता जाणवल्यास नजिकच्या सुरक्षित ठिकाणी ग्रामस्थांना हलविण्यात येऊन सर्व सोयी संभाव्य अतिवृष्टीकाळात देण्याचे निर्देश यावेळी पालकमंत्री यांनी दिले. यावेळी पुरग्रतांना होणाऱ्या मदतीचे अन्नधान्य, चादर तसेच टॉवेलच्या किटचे पॅकेट स्वतः अदिती तटकरे यांनी पाहणी केली.

उसरोलीत आदिवासी बांधवाना खावटी वाटप

। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।

उसरोली ग्रामपंचायत हद्दीमधील १६५ आदिवासी बांधवाना खावटी योजनेचा फायदा देण्यात आला आहे. आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन योजनेअंतर्गत प्रत्येक आदिवासी बांधवाना दोन हजार रुपये रोख व जीवनावश्यक वस्तूचे वाटप उसरोली ग्रामपंचायत सरपंच मनीष नांदगावकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नांदगावकर यांनी उपस्थितांसमोर आपले मनोगत मांडताना सांगितले की, जंगल व डोंगर भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांसाठी राज्य शासनाची खावटी योजना वरदायी आहे.आदिविकास प्रकल्पचे सर्व अधिकारी या बांधवाना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी थेट आदिवासी लोकांपर्यंत पोहचून या योजनेचा फायदा मिळवून देत आहेत.आजच्या महागाईच्या जगात एवढी मोठी मदत मिळणे हे खूपच हितकारी असून त्यामुळे आदिवासी बांधवाना मोठा दिलासा मिळत असल्याचे त्यांनी सागितले. उसरोली ग्रामपंचायत हद्दीमधील जास्तीत जास्त आदिवासी बांधवाना खावटी योजनेचा फायदा मिळावा म्हणून दिनेश वाघमारे यांचे सहकार्य घेत आधार कार्ड, बँक पास बुक, रेशनकार्ड याचे संकलन करून या योजनेचा फायदा मिळवून देण्यासाठी बहुमूल्य सहकार्य केले. यावेळी मुरुड तालुका प्रमुख संतोष सगर, आर.एच.पाटील, सी.एस.काळे, पी.के.तिवरे, माधुरी लोखंडे, पी.पी.मोरे, कादिर मलीक, दिनेश वाघमारे आदी उपस्थित होते.

गरीब कामगाराचे मिळवून दिले पैसे

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यात हार्दिक ग्रुप यांचे एका इमारतीचे बांधकाम चालू आहे. येथील मालक श्री जग्गी यांच्याकडे खोपोली येथील कामगार सलीम शेख यांचे अनेक दिवसांपासून कामाचे एक लाख रुपये थकीत होते. मनसे सुधागड तालुकाध्यक्ष सुनील साठे यांनी गुरुवारी (ता.२९) मनसे स्टाईलने सलीम शेख यांची थकीत रक्कम मिळवून दिली. वारंवार तगादा लावून देखील सलीम शेख यांना त्यांचे पैसे मिळत नव्हते. मग त्यांनी मनसे सुधागड तालुकाध्यक्ष सुनील साठे यांच्याकडे संपर्क साधला. सुनील साठे यांनी जग्गी यांना ताबडतोब फोन करुन सलीम शेख यांचे पैसे देण्यासाठी सांगितले.

ॲड. एस.वाय.बारटक्के
अर्जदाराचे वकील

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र. ६३/२०२१

श्री. माधव रामचंद्र नाईक
वय-७८, धंदा-शेती व व्यापार
मु. सोंडेपार-चौल, ता. अलिबाग, जि. रायगड .... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ..... सामनेवाला

या जाहीर संमन्स/ नोटीस द्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार हे कै. राजेश माधव नाईक यांचे वडिल असून कायदेशीर वारस आहेत. कै. राजेश माधव नाईक हे दिनांक २०.१०.२०२० रोजी मौजे चौल, ता. अलिबाग येथे मयत झाले. अर्जदार हेच कै. राजेश माधव नाईक यांचे कायदेशीर वारस असून अर्जदार यांचे शिवाय कै. राजेश माधव नाईक यांस अन्य कोणीही वारस नाहीत. कै. राजेश माधव नाईक यांचे नावे मौजे चौल, अलिबाग येथे असलेल्या हॉटेल पी.पी. रेस्टॉरंट या नावाने देण्यात आलेला दारु विक्री परवाना/ लायसन्स क्र. ४०६/२०१६-२०१७ देण्यात आला होता. त्या संदर्भात अर्जदार यांचे नावे वारसपत्र दाखला/हेअरशिप सर्टीफिकेट मिळणेकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात सदर अर्ज दाखल केला आहे. सबब, या जाहीर समन्स द्वारे कळविणेत येते की, अर्जदार यांचे नावे असा दाखला देणेत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचे मार्फत या दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयात दि. १/०९/२०२१ रोजी हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
वरिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायाधीश व स्तर, अलिबाग

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
दिवाणी न्यायाधीश व स्तर, अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी मौजे-यशवंतखार, ता.रोहा, येथील खुद्द/सामाईक मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पैसे)
यशवंतखार	२८५	०-२३-४०	५.१९
ता.रोहा		पो.ख. ०-००-८०	
जि.रायगड		एकूण ०-२४-२०	

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबेकब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हित संबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ०७ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ३०/०७/२०२१

सही/
नितेश पां.ठाकूर
मु.यशवंतनगर,पो.सानेगाव,ता.रोहा
मो. ८९८३४५८३६०

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे-वडवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत श्री.संभाजी तुकाराम लबडे यांचेकडून खरेदीखताने कायमस्वरूपी खरेदी करण्याचे योजिले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे-वडवली, ता.कर्जत, जि.रायगड

भूमापन क्र.	भूमापन क्र.चा उपविभाग	क्षेत्र हे.आर.चौ.मी	आकार रु.पै.
५	१/ह	०-४०-००	०-४८

वर नमूद मिळकतीस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न-वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस, इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचे खरेदीखत कायदेशीरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक ३०/०७/२०२१ सही/-
ठिकाण-पनवेल
ॲड.शरद जाधव
संपर्कासाठी पत्ता
तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग,
भुखंड क्र.११३, मिडल क्लास को.ऑप.
हौ.सोसायटी, पनवेल-४१०२०६,
ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.९८२०६३७१७५

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,
मौजे कुडली, ता. रोहा येथील गट नं. २१५/४ क्षेत्र १-८४-० आकार १.४६ रु.पैसे ही मिळकत आमचे अशिल श्री. बाळाराम राजाराम दळवी व इतर यांचे मालकीची आहे. सदर मिळकतीवर आज रोजी प्रत्यक्ष ताबे कब्जात आमचे अशिल श्री. बाळाराम राजाराम दळवी व इतर यांचा आहे. सदर मिळकत आमचे अशिलांचे वडील राजाराम कृष्णा दळवी यांनी वर्दी देवून वाटप केल्याबद्दल फेरफार क्र.३४९ दाखल आहे. सदर फेरफारनुसार २१५/४ ही मिळकत राजाराम कृष्णा दळवी यांचे हिश्श्यास फेरफार क्र.३४९ नुसार आलेली आहे. परंतु सबंधीत महसूल अधिकारी यांनी चुकीचा अंमल दिल्याने राजाराम कृष्णा दळवी यांचे ऐवजी जयराम कृष्णा दळवी असे चुकीने नमुद झालेले आहे. सदरची झालेली चुकी संबंधीत महसूल अधिकारी यांची असून ती दुरूस्त होणे करीता आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करणार आहेत. परंतु आज रोजी सदर मिळकत जयराम कृष्णा दळवी यांचे नावे असून ते बेकायदेशीररित्या सदर मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. सदर मिळकतीशी जयराम कृष्णा सावंत यांचा काडीमात्र संबंध नाही.
तरी मौजे कुडकी, ता. रोहा येथील गट नं.२१५/४ क्षेत्र १-८४-० आकार १.४६ रु.पैसे या मिळकती संबंधी जयराम कृष्णा दळवी यांचे सोबत कुणीही कसलाही खरेदीचा अथवा कोणतेही व्यवहार इतर व्यक्तीबरोबर करू नये. या अनुषंगाने कोणताही व्यवहार झाल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. तसेच कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर प्रसिद्ध केली आहे.

माणगांव सही/-
ता.३०/०७/२०२१
ॲड.नितिन वि.आंब्रे
रा.श्री.जी.कॉम्प्लेक्स, A विंग
३ रा मजला कचेरी रोड माणगाव,
९८५०८२१४१३

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, मी विकत घेणार सौ. मनिषा देवेंद्र पाटील खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री.चिंतामण मंगल म्हात्रे व श्री. रामदास मंगल म्हात्रे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मौजे चांधई ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत

स.नं.	हि.नं.	क्षेत्र (हे.आर)	क्षेत्र (रु.पै.)
४८	२ ब	०-४३-०० पैकी ०-२३-०० गुंठे विकत दिलेले क्षेत्र	०-४४

सदरची मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तंद्गभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांस विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, ॲटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दिनांक : ३०/०७/२०२१
सौ. मनिषा देवेंद्र पाटील
पत्ता :-देवेंद्र पाटील, राजाराम निवास
सत्यवान चौक, देविचा पाडा,
डोंबिवली वेस्ट, ता.कल्याण, जि.ठाणे
फोन नं.८४४६११९९९२

प्रोसेज जमा रु. /-
ॲड. प्रशांत प्रकाश थळकर
अर्जदाराचे वकील

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.प्रथम न्याय दंडाधिकारी सो. रायगड यांचे न्यायालयात
फौजदारी चौकशी अर्ज.क्र.१४९/२०२१

ज्योती पांडुरंग कालवणकर .... अर्जदार

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत परहूर ..... सामनेवाला

या जाहीर समन्स/नोटीस द्वारे कळविण्यात येते की, अर्जदार हिची सासू कै. सावित्रीबाई धोंडू कालवणकर हिचे दिनांक २९/०३/२०१५ रोजी मौजे परहूर (संत रोहिदास वाडी), पो.कामालें, ता.अलिबाग, जि.रायगड येथील राहत्या घरी निधन झाले आहे. तिची जन्म-मृत्यू नोंद ग्रुप ग्रामपंचायत परहूर, पो.कामालें, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या कार्यालयात जन्म-मृत्यचे दफ्तरी सन २०१५ रोजी नोंदविण्याची अनावधानाने व नजर चुकीने राहून गेली आहे. सदरच्या मृत्यूची नोंद होणेचा आदेश मिळण्याकरीता मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदरच्या आदेशास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी व वकील यांचे मार्फत या मे.प्रथम न्यायदंडाधिकारी सो. या न्यायालयात हजर रहावे. अन्यथा कोणाची कसलीही हरकत नाही असे समजले जाईल व एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
कनिष्ठ लिपीक
मुख्य दंडाधिकारी

कोर्टाचा शिक्का

सही/-
स.अधिक्षक
मा.मुख्य दंडाधिकारी

नारायण भोईर यांचे निधन

। वाकण । वार्ताहर ।

शेतकरी कामगार पक्षाचे नागोठणे विभागातील ज्येष्ठ नेते, माजी आमदार धैर्यशील पाटील यांचे कट्टर समर्थक व रायगड जिल्हा परिषदेचे निवृत्त मुख्याध्यापक तसेच नागोठणे येथील दत्तकृपा कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूटचे संचालक नारायण भोईर गुरूजी (वय ६७) यांचे रविवारी (दि. २५) रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच त्यांचे मूळ गाव असलेल्या शिहू-जांभूळटेप व नागोठणे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, नातेवाईक यांच्यासह मोठा परिवार आहे. भोईर गुरुजी हे अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांनी आपल्या शिक्षकी पेशात अनेक विद्यार्थ्यांना घडविले. आज त्यांचे अनेक विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत. भोईर गुरुजी हे तरुणपणापासून शेतकरी कामगार पक्षात कार्यरत होते. नोकरी करीत असताना देखील त्यांनी पक्षनिष्ठा कायम ठेवली. पक्ष संघटना वाढीसाठी ते नेहमीच कार्यरत राहत असत.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांना मौजे-आशाणे, ता.कर्जत, जि.रायगड येथील सर्व्हे नंबर २१, हिस्सा नंबर ३, क्षेत्र ०-६१-०० हे.आर.पॉ.आकार ०० रु.-०३ पैसे, पैकी शेतकरी यांस त्यांच्या हिश्याचे विकावयाचे क्षेत्र ०-२१-०० हे.आर.पॉ.,आकार ०० रु-०३, पैसे वरील जमिन मिळकतीचे विद्यमान मालक वासुदेव मालू ठाणगे, यांचेकडून रजिस्टर्ड दस्तऐवजाने विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी मिळकतीच्या विद्यमान मालक व आमचे अशिल यांच्यात झालेली आहेत. वर वर्णन केलेल्या मिळकतीची मालकी व ताबा कब्जा विद्यमान मालक यांचाच आहे. असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. तरी वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्नवस्त्राचा बोजा, वहीवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क तसेच अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत हक्क व ताबा कब्जा विद्यमान मालक यांचाच आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत **ॲड.वसंत गोविंद रवणे**
दि.३१/०७/२०२१ रा.माऊली को.हा.सो.,फ्लॅट नं.१०४,
पहिला मजला, ए विंग, विठ्ठल नगर कर्जत, जि.रायगड

खालापूर तालका शिक्षण प्रसारक मंडळ, खोपोली
र.न.ई.६४ (रायगड)
वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

जा.क्र. /२०२१-२२ दि.३०/०७/२०२१

प्रति,
मा.श्री./श्रीमती.....
.....

महोदय/महोदया,

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक ११/०८/२०२१ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता ऑनलाईन घेण्यात येणार आहे. कृपया सर्व सभासदांनी वेळेवर खालील दिलेले युजर आयडी व पासवर्डचा वापर करून सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू
सही/-
(संतोष जंगम)

सभेचे नियमः-
१.मागील दिनांक १४/८/२०२० रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२.सन २०२०-२०२१ च्या अहवालात मान्यता देणे.
३.सन २०२०-२०२१ च्या ताळेबंदास व हिशोबास मान्यता देणे.
४.सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
५.सन २०२१-२०२२ करिता संस्थेच्या लेखापाल यांची नियुक्ती करणे
६.मा.अध्यक्षांच्या पुर्व संमतीने ऐनवेळी आलेल्या कामांचा विचार करणे

सुचनाः-
१) गणसंख्येअभावी वरील सभा तहकूब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी १० मिनीटानंतर होईल. सदर सभेला गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) स्थानिक वृत्तपत्रात सभेची नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. याची सभासदांनी नोंद घ्यावी. सभासदांना अहवालाची प्रत कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.
३) सभासदांना २०१९-२०२० च्या ताळेबंदाची शेड्युल्स पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.
४) सभेचा युजर आय डीः- ९२० ०२१ २६१६ पासवर्डः-Ktsp123

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग
नगर विकास शाखा
हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१
दूरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२०२२९, फॅक्स नं. :- ०२१४१-२२७४५१/२२२०२५
Email.id-raigaddpo2013@gmail.com
ई-निविदा सूचना, सन २०२०-२१
जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड

नगरविकास विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथून रायगड जिल्ह्यातील नगरपरिषद सन २०१७-१८ ते २०२०-२१ (महाड, माथेरान, उरण, पेण, मुरुड-जंजिरा, श्रीवर्धन, रोहा (२०२०-२१ वर्षाकरिता) व नगरपंचायतीचे सन स्थापन झाल्यापासून ते २०२०-२१ या आर्थिक वर्षांचे (तळा, पोलादपूर, खालापूर, माणगाव (२०२०-२१ वर्षाकरिता), म्हसळा (२०२०-२१ वर्षाकरिता) द्विनोंद लेखा पद्धतीने वर्गीकरण करणेसाठी सनदी लेखापाल यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	बयाणा रक्कम	कोऱ्या निविदेची रक्कम
१.	महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०१३ नुसार उपार्जित तत्वावरील दुहेरी नोंद लेख पद्धतीप्रमाणे रायगड जिल्ह्यातील नगरपरिषद सन २०१७-१८ ते २०२०-२१ व नगरपंचायतीचे सन स्थापन झाल्यापासून ते सन २०२०-२१ चे आर्थिक व्यवहाराच्या जमा खर्चाच्या नोंदी, सर्वसाधारण रोकडवही, बँक वही जर्नलस सर्वसाधारण रोकडवही, बँक वही जर्नल, सर्वसाधारण खातेवाहीमध्ये घेऊन संबंधित ट्रायल बॅलन्स, बॅलन्स शीट, जमा खर्च खाते, ताळमेळ पत्रक, त्रेमासिक वार्षिक लेखे व इतर अनुषंगिक लेखे तयार करुन मा. आयुक्त तथा संचालक नगर परिषद संचालनालय, वरळी, मुंबई यांचे आवश्यक त्या मान्यतेसह नगरपरिषदेला सादर करण्याचे काम.	र.रु.२९,३५,०००/-	२९३५०/-	२०००/-

वरील कामांची ई-निविदा योग्य त्या सनदी लेखापालांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदरची ई-निविदासूचना http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ई-निविदा डाऊनलोड करणेचा व ऑनलाईन भरणेचा कालावधी दि. ३१-०७-२०२१ सकाळी ११.०० वा. ते दि. १४-०८-२०२१ सायं. ५.०० वा. पर्यंत राहील.

ठिकाण : जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग
दिनांक :- २९-०७-२०२१

सही/-
अपर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय,
रायगड-अलिबाग

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक

कलासक्त मोगले आझमची ६१ वर्षे...

'मोगले आझम'चं पहिलं तिकिट

'मोगले आझम' बघण्याची प्रेक्षकांच्या मनात इतकी उत्सुकता होती की सामान्य प्रेक्षकांसाठी असलेल्या पहिल्या शोचं ॲडव्हान्स बुकिंग पहिल्या तासाभरातच हाऊसफुल्ल झालं होतं. मुंबईच्या मदनपुरा परिसरातला त्यावेळचा कुविख्यात गुंड शमसुद्दीन पहेलवान याने आपलं सर्व वर्चस्व पणाला लावून आपल्या साथीदाराकरवी आम पब्लिकसाठी सुरू झालेल्या पहिल्या शोचं पहिलं तिकीट मिळवलं. पहिल्याच शोनंतर 'मोगले आझम'ची इतकी माऊथ पब्लिसिटी सुरू झाली की चित्रपट पाहण्यासाठी ॲडव्हान्स बुकिंगसाठी अनेक तास रांगांमध्ये उभं राहावं लागत होतं. शोचं तिकीट मिळावं यासाठी प्रेक्षक रात्रभर थिएटर्सच्या बाहेर पथाऱ्या टाकून झोपत होते व सकाळ झाली की बुकिंग विंडो उघडण्यापूर्वी त्यासमोर रांगा लावत होते. तिकिटांसाठी प्रत्येक थिएटरवर माणसांची झुंबड उडत असल्यामुळे महिलांसाठी स्वतंत्र अशी लेडिज स्पेशल बुकिंग विंडो तयार करण्यात आली. 'आन', 'झांसी की रानी' हे चित्रपट १७-१८ रिळांचे बनले होते. परंतु २० रिळं असलेला 'मोगले आझम' हा पहिलाच भारतीय चित्रपट होय.

मेहमुद व शीश महल

'प्यार किया तो डरना क्या' गाण्याचा शीश महलचा सेट के.आसिफ यांच्या मनाला इतका भावला होता त्यामुळे चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरही अनेक महिने मोहन स्टुडियोमध्ये तसाच ठेवला होता आणि स्टुडियोच्या मालकाने तगादा लावल्यावर स्टुडियोच्या गोडाऊनमध्ये व्यवस्थित ठेवुन त्याचं भाडं देत होते. त्याचदरम्यान विनोदी अभिनेता यांच्या बहिणीचा विवाह होता व आपल्या बहिणीच्या लग्न अनोखी पध्दतीने व्हावं अशी मेहमूदची इच्छा होती. त्यामुळे त्यांनी के.आसिफ यांच्याकडे शीश महलचा सेट लग्नसमारंभासाठी वापरण्याबाबत विचारले तेव्हा एक पैशाचाही मोबदला न घेता के.आसिफनी मेहमुदना तो सेट वापरायला तर दिलाच परंतु सेट लावताना ते स्वत: त्या ठिकाणी हजर राहिले होते.

प्रिमियरला दिलीप कुमार गैरहजर

दिलीप कुमारशी मैत्री जमल्यामुळे के.आसिफ त्यांच्या घरी जात असत. त्याच दरम्यान दिलीप कुमार यांची बहिण अख्तरशी त्यांचे प्रेमप्रकरण सुरु झाले. आसिफ यांचे आधीच दोन विवाह झाले होते. सुप्रसिद्ध नृत्यांगना सितारा देवी या आपल्या मामीशीच के.आसिफनी पहिला विवाह केला होता तर त्यांची द्वितीय पत्नी होती अभिनेत्री निगार सुल्तान ते सहा मुलांचे पिताही होते. असं अनुनही 'मोगले आझम' पूर्ण होताच घरच्यांच्या विरोधाला न जुमानता एक दिवस अख्तरनी घरातून पलायन करून के.आसिफ यांच्याशी विवाह केला. हेच कारण होतं की 'मोगले आझम'ची ट्रायल आणि प्रिमियर या दोन्हींवर बहिष्कार टाकत दिलीप कुमार गैरहजर राहिले. त्यांच्या प्रिमियरला न येण्यामुळे या घटनेविषयी चित्रपटसृष्टीमध्ये बरीच उलटसुलट चर्चा झाली होती. असंही म्हटलं जातं की फिल्मफेअर ॲवॉर्ड कमिटी मेंबर्सनी दिलीप कुमार यांच्याशी संपर्क करून 'मोगले आझम'साठी त्यांना त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्याचा प्रस्ताव ठेवला होता. परंतु दिलीप कुमार यांनी पुरस्कार घेण्यास नकार दिला होता.

अद्भूत, अलौकिक, अकाल्पनिक, विलक्षण, भव्यदिव्य....ही सर्व विशेषणं 'मोगले आझम' या चित्रपटाला चपलख बसतात. कारण येत्या ५ ऑगस्ट रोजी हा चित्रपट प्रदर्शित होऊन तब्बल ६१ वर्ष पुर्ण होत आहेत मात्र आजही या चित्रपटाची लोकप्रियता, प्रेक्षकांच्या मनावरील या सिनेमाचं गारुड कणभरही कमी झालेलं नाही. आज भले १००, २००, ५०० कोटींचे चित्रपट बनत असले तरीही 'मोगले आझम' च्या आसपास फिरकणारा एकही सिनेमा गेल्या ६१ वर्षात कुणीही बनवु शकलेलं नाही.

उर्दू नाट्यकर्मी इम्तियाज अली ताज यांनी १९२२ मध्ये नाटकाद्वारे व नंतर १९२८ साली निर्माता-दिग्दर्शक अर्देशीर इराणींनी 'अनारकली' या मुकपट व बोलपटाद्वारे राजपुत्र सलीम, त्याची प्रेयसी अनारकली यांची प्रेमकथा, त्यांना असलेला बादशहा अकबरचा विरोध व त्यामुळे पिता-पुत्रामध्ये निर्माण झालेला संघर्ष हे कथानक सर्वप्रथम प्रेक्षकांसमोर सादर केलं होतं.

इसवी सन १५५६ ते १६०५ मोगल राजवटीमधला मुघल बादशहा अकबरची यशस्वी राजवट, शौर्य, निःष्पक्ष न्यायव्यवस्था, कलासक्तता याविषयी दिग्दर्शक के.आसिफ यांच्या मनात नितांत आदर होता. त्यामुळे १९४६ च्या सुमारास के.आसिफनी या विषयावरील संशोधन करुन चंद्रमोहन, नर्गिस, सप्रू, दुर्गा खोटे, वीणा आदी कलावंताची निवड करुन आंतरराष्ट्रीय स्तरावरचा चित्रपट बनवण्यास सुरु केला. सलीम-अनारकली यांची प्रेमकथा असली तरी या सिनेमाचं कथानक बादशहा अकबर आणि सलीम यांच्यामधल्या संघर्षाभोवती फिरणार असल्याने चित्रपटाचं नाव ठेवण्यात आलं 'मोगले आझम' !

शुटिंग सुरळीत सुरु झालं खरं परंतु काही काळातच अकबरची भूमिका करणाऱ्या चंद्रमोहनचं अचानक निधन झाल्याने चित्रपटाचं शुटिंग थांबलं. त्याच सुमारास भारत-पाकिस्तान फाळणी झाली व चित्रपटाचा निर्माता सराज पाकिस्तानात निघून गेला. या दोन्ही घटनांमुळे 'मोगले आझम' चं भवितव्य धोक्यात आलं. दिड दोन वर्षांनी सढळ हाताने पैसा खर्च करणारे निर्माता शापुरजी पालनजी मिळाल्यानंतर जोधाबाईची भुमिका करणाऱ्या दुर्गा खोटेंचा अपवाद वगळता के.आसीफनी पुर्वीचे सर्व कलाकार बदलून त्यांच्याऐवजी दिलीपकुमार, मधुबाला व पृथ्वीराज कपूर या कलाकारांना घेऊन नव्याने चित्रपटाच्या चित्रिकरणाला सुरुवात केली.

पहिल्याचं दिवशी पथ्वीराज कपुर यांचं शुटिंग सुरु झालं तेव्हा ते बादशहाप्रमाणे अदबशीर, छाती पुढे काढत टबाज चालत नसून सर्वसामान्य माणसाप्रमाणे चालत होते. परंतु आठ दिवस चालण्याचा सराव केल्यानंतर त्यांनी बादशहाची चाल आत्मसात केली. केवळ या चित्रपटासाठी त्यांनी खास खर्जामध्ये संवाद म्हटले होते. त्यामुळे अनेकदा त्यांचा घसा बसत असे. त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा काळा मस्सा खास लंडनमध्ये बनवला गेला होता. भव्यदिव्य चित्रपट बनवण्याच्या ध्यासापोटी के. आसिफ कुठल्याही प्रकारची रचनात्मक तडजोड करण्यास तयार नव्हते. कलाकारांचे कपडे डिझाइन करण्यासाठी खास दिल्लीहून टेलर्स बोलवण्यात आले होते तर त्यावर कशीदा, नक्षीकाम करण्यासाठी सुरत खंबायतचे कारागिर मासिक वेतनावर नेमले होते. या कपड्यांसाठी वापरण्यात येत असलेलं कापड अत्यंत उच्च दर्जाचं होतं. कोल्हापूरच्या तज्ज्ञ व्यक्तींद्वारे जिरेटोप, मुकुट बनवले गेले व आग्र्याहून मोजड्या आणल्या गेल्या. जोधाबाई, अकबर, सलीमचे अलंकारसुध्दा खरे मोती, रत्नं व सोन्याचा वापर करुन हैद्राबादच्या सराफांकडून तयार केले. मोहे पनघट पे या गाण्यात वापरलेली कृष्णाची मुर्ती अस्सल सुवर्णाची आहे. युद्धप्रसंगासाठी २००० उंट, आठ हजार सैनिक, ४०० घोड्यांचा वापर करण्यात आला होता.

चित्रपटातील गाणी संगीतबद्ध करण्यासाठी त्याकाळात लोकप्रिय असलेल्या नौशादना पाचारण करण्यात आलं तर गीतकार म्हणून शकील बदायुनींची निवड झाली. निर्मात्याकडून पैशांचा पुरवठा झाला की गाणी रेकॉर्ड केली जात असत. त्यामुळे बहुसंख्य गाणी तर चित्रपटाचं शूटिंग सु. रू झाल्यानंतरच टप्प्याटप्प्याने रेकॉर्ड करण्यात आली. 'प्यार किया तो डरना क्या' या गाण्याचे १८ मुखडे शकील बदायुनींनी लिहिले होते. त्यातील तीन निवडण्यात आले. या गाण्यातील शेवटच्या ओळीमध्ये के.आसिफना एको व नंतर आलाप हवा होता. परंतु त्याकाळी रेकॉर्डिंग तंत्र अद्यावत नसल्याने लता मंगेशकरना दुसऱ्या रेकॉर्डिंग रूममध्ये माइकपासून थोड्या अंतरावर उभं राहण्यास सांगून ती ओळ म्हणत माइकच्या दिशेने येण्यास सांगितलं. दुसऱ्यांदा याच पद्धतीने लताबाईंकडुन तसंच रेकॉर्डिंग केल्यानंतर त्या ओळीमध्ये हवा तसा एको फील मिळाला होता. हे गाणे चित्रित करण्यासाठी उभारलेला शीश महालचा सेट दिड कोटींचा होता. परंतु गाण्याच्या चित्रिकरणादरम्यान प्रकृती अस्वास्थ्यामुळे कथ्थक अदा - गिरक्या घेणं मधुबालांना अशक्य असल्याने मधुबालाप्रमाणे सडपातळ व नाजूक शरीरयष्टी असणाऱ्या लक्ष्मी नारायण या लछ्छू महाराजांच्या शिष्यावर या गाण्याचा काही भाग चित्रित करण्यात आला. त्यासाठी मधुबालांना समोर बसवून बी.आर.खेडकर यांनी मधुबालाच्या चेहऱ्याचा कागदाचा साचा तयार केला व नंतर अंधेरीतील एका फुगा फॅक्टरीतुन तसाच रबरी मास्क तयार केला होता. गाण्याच्या चित्रीकरणादरम्यान लक्ष्मी नारायणच्या चेहऱ्यावर हा मास्क चढवून त्याचे कथ्थक अदा व गिरक्यांचे शॉट्स घेण्यात आले. शीश महलच्या आरशांच्या प्रत्येक फ्रेममध्ये गिरक्या घेणारी मधुबाला नसून लक्ष्मीनारायण आहे.

ख्यातनाम शास्त्रीय गायक बडे गुलाम अली खां पार्श्वगायन केलेला हा एकमेव चित्रपट. यातील दोन गाण्यांसाठी त्यांना प्रत्येकी २५ हजार रुपये मानधन देण्यात आलं होतं. मोहम्मद रफींनी गायलेल्या 'ए मोहोब्बत झिंदाबाद' या गाण्यामध्ये १०० कोरस गायकांचा आवाज वापरण्यात आला.

त्यावेळी दिलीप कुमार- मधुबाला यांचं प्रेमप्रकरण सुरु होतं मात्र मधुबालाचे वडील अताउल्ला खान सतत सेटवर हजर राहत असल्याने त्या दोघांना एकमेकांशी प्रेमालाप करता येत नसे. सलीम-अनारकली यांचा प्रेमप्रसंग चित्रित करण्यासाठी अताउल्ला राजी न झाल्याने के.आसीफनी शक्कल लढवली व सेटबाहेर चित्रपटाच्या पीआरओला दिवसभर अताउल्लांसह पत्यांचा डाव खेळायला लावून ते जिंकले पाहिजेत अशी सुचना केली, जेणेकरुन त्यांचं मन खेळात रमावं. त्यासाठी त्यांनी तब्बल २५ हजार रुपये खर्च केले. मात्र त्यांच्या अंदाजाप्रमाणे पैसे जिंकत असलेले अताउल्ला खेळात रमले आणि के.आसिफनी दिवसभरात तो प्रेमप्रसंग चित्रित केला.

'मोगले आझम' पुर्ण होण्यास दहा वर्ष लागली त्याची असंख्य कारण होती. सर्व कलाकारांच्या एकत्र तारखा, पैशांचा ओघ, वगैरे पण सर्वात मोठं कारण होतं ते के. आसिफ रचनात्मक तडजोड न करण्याचं. राजपुत्र सलीम १४ वर्षांनी पुन्हा बादशहा अकबरच्या महालात प्रवेश करतो तेव्हा जोधाबाई मोती उधळण्यास सांगते. या सीनसाठी आसीफना अस्सल मोती हवे होते तर शापुरजी ते देण्यास तयार नव्हते. या कारणास्तव सहा महिने शुटिंग बंद होतं. अखेर शापुरजींना माघार घ्यावी लागली होती. जयपुरच्या आमेर फोर्ट रस्त्यावर शुटिंग करताना रस्त्याच्या कडेला उभारलेले दोन-तीन विजेचे खांब दिसताच कॅमेरा अँगल न बदलता आसीफनी शुटिंग रद्द केलं व जयपूर महापालिकेला सीनचं महत्व पटवून दिल्यानंतर तीन महिन्यांनी विजेचे खांब तात्पुरते हटवून मगच चित्रिकरण केलं.

चित्रपटाची भव्यता, त्याचं चित्रीकरण, अभिनय, संवाद सर्वच इतकं अप्रतिम होतं की चित्रपटाची ट्रायल पहाताच वितरकांच्या उड्या पडल्या आणि प्रत्येक राज्यातील टेरेटरीमध्ये हा चित्रपट १५ लाख रुपये किमतीला विकला गेला. त्या काळामध्ये मोठे स्टार असलेले चित्रपटदेखील चार-साडेचार लाखांमध्ये विकले जात असत. लेकिन 'मोगले आझम' की बातही कुछ और थी !

५ ऑगस्ट १९६० रोजी 'मोगले आझम' भारतातल्या तब्बल १५० चित्रपटगृहांमध्ये एकाच वेळी प्रदर्शित झाला. आदल्या दिवशी म्हणजे चार ऑगस्टला बॉम्बे सेंट्रल परिसरातल्या मराठा मंदिर थिएटरमध्ये या चित्रपटाचे दोन भव्य प्रिमियर्स आयोजित करण्यात आले होते. मराठा मंदीरचे उद्घाटन याच चित्रपटाने करण्यात आलं होतं. दोन प्रिमियर होणारा हा पहिलाच हिंदी चित्रपट असावा. सोनेरी वर्खाने नटलेल्या प्रिमियरच्या निमंत्रण पत्रिकेवर चांदीमध्ये निमंत्रणाचा मजकूर एम्बॉस करून प्रिंट करण्यात आला होता. संपूर्ण थिएटर रोषणाईने झगमगत होतं.

संध्याकाळ व रात्रीचा प्रिमियर सोहळा आणि त्याला उपस्थित राहणाऱ्या चित्रपटसृष्टीमधल्या तमाम सेलिब्रिटिजना बघण्यासाठी मराठा मंदिरच्या रस्त्यावर अक्षरश: माणसांचा समुद्र पसरला होता. जवळपास २७-२८ हजार माणसं जमा झाली होती. गर्दी नियंत्रित करणं पोलिसांनादेखील शक्य होत नव्हतं. चित्रपटाची प्रिंट हत्तीवरून आणली गेली. तसंच बादशहा अकबरची व्यक्तिरेखा साकार करणारे पृथ्वीराज कपूर यांचं शाही इतमामात हत्तीवरून आगमन झालं. गुरूदत्त, वहिदा रेहमान, कमाल अमरोही, मीना कुमारी, सोहराब मोदी, आगा, मुक्री, बी.आर.चोप्रा , राज कपूर आदि मान्यवर प्रिमियला हजर होते. २० रिळं असलेला 'मोगले आझम' हा पहिलाच भारतीय चित्रपट होय. चित्रपटांची लांबी अधिक असल्याकारणाने दररोज दुपारी तीन, संध्याकाळी साडेसहा आणि रात्री साडेनऊ असे तीनच शो आयोजित करण्यात आले होते.

त्यावेळी स्टॉलच्या पहिल्या तीन रांगांसाठी तिकिटाचा दर होता दहा आणे, त्याच्या पाठीमागच्या रांगांच्या तिकिटाचा दर होता एक रुपया पाच आणे तर बाल्कनीच्या तिकिटांचे दर होते दोन रुपये दहा आणे. पाच रुपयांमध्ये ब्लॅकची तिकीटं विकली जात होती. केवळ भारतातल्या मुख्य शहरांमध्येच नव्हे तर संपूर्ण भारतभर या चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. पहिल्याच आठवड्यात या चित्रपटाने ४० लाखांचा धंदा केला.

आठवण
अनिता पाध्ये

मुंबईचे महानुभाव नाना शंकरशेट

आधुनिक मुंबईची पायाभरणी करणारे एक प्रमुख महानुभाव जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेट यांच्या अफाट कामगिरीची आज आपल्याला आठवण येते. ज्या महापुरुषानं मुंबईत रेल्वे, महापालिका विद्यापीठ आणि मुलींची पहिली शाळा आदी उभं करण्यात सिंहाचा वाटा उचलला. त्या शंकरशेट यांचं यथोचित स्मारक आजही या महानगरीत उभं राहू नये हे दुर्दैवच म्हणावं लागेल.

निमित्त
वसंत चौलकर

जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेट यांचा जन्म १८०३ साली मुरबाड इथं झाला तर त्यांचं निधन झालं १८६५ या वर्षी. नानांचे वडील व्यापारासाठी मुंबईत आले. ते लहान असतानाच त्यांची आई भवानीबाई यांचं देहावसान झालं. परंतु शंकरशेट यांनी नानांचं शिक्षण योग्य प्रकारे व्हावं यासाठी भारतीय पारंपारिक आणि इंग्रजी शिक्षणाची सोय घरीच केली. नाना अत्यंत कुशाग्र बुद्धीचे होते. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. ते मराठीप्रमाणेच संस्कृत आणि इंग्रजीत उत्तम लिखाण करत असत. नानांचे वडील १८२२ साली वारले तेव्हा ते फक्त १९ वर्षाचे होते. नानांवर सर्व जबाबदारी पडली आणि ती त्यांनी समर्थपणे पार पाडली.

आपल्या ६२ वर्षाच्या आयुष्यात नानांनी केलेलं कार्य पाहिलं की आजही आपण अचंबित होऊन जातो. त्यांच्या कामगिरीचं वर्णन करायला शब्द अपुरे पडतात. नानांचं एक ठळक कार्य म्हणजे बॉम्बे असोसिएशन या नागरी संघटनेची स्थापना त्यातूनच स्फूर्ती घेऊन भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचं बीजारोपण झालं. याच मुंबईत १८८५ साली काँग्रेसचं पहिलं अधिवेशन झालं.

मुंबईत १८१९ साली माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन या गव्हर्नरन शिक्षणाचा पाया घातला. नानांचं सामाजिक स्थान, नानांचं सामाजिक स्थान, पुरोगामी वृत्ती आणि प्रगल्भता पाहून एल्फिन्स्टनने नंतर या प्रयत्नामध्ये नानांना सहभागी करुन घेतलं. बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी १८२४ साली स्थापन झाली. पुढे सदाशिव छत्रे आणि जगन्नाथ शास्त्री यांच्या सहकार्यानं नानांनी मुंबईत अनेक शाळा उघडल्या. त्यामुळे शिकणाऱ्या मुलांची संख्या आणि शिक्षणाचा प्रसार वाढवण्यात मदत झाली. पुढे रेव्हरंड विल्सन यांच्या सांगण्यावरुन नानांनी आपल्या एका इमारतीत मुलींच्या शाळेला जागा दिली.

नानांचा आग्रह आधुनिक शिक्षण स्थानिक मुलांना देता यावं यासाठी असे नेटिव्ह स्कूल सोसायटी समाजातील काही पुढाऱ्यांसह त्यांनी स्थापन केली. याचाच परिपाक पुढे मुलींसाठी पहिली शाळा काढण्यात झाला. स्वाभाविकच परंपरेच्या जोखडात अडकलेल्या भुखंडांनी त्यास विरोध केला. मात्र नानांचा प्रभाव एवढा होता की, कालांतरानं ही शाळा सुरु झालीच. नानांनी अर्थातच त्यासाठी आवश्यक तो पाठिंबा आणि आर्थिक आधार दिला. मात्र त्याबरोबरच एक संस्कृत पाठशाळा आणि वाचनालय सुरु करण्यासाठीही प्रयत्न केले. नानांचं योगदान पाहून सरकारनं स्थापन केलेल्या बोर्ड ऑफ एज्युकेशनचे सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. मुंबई विद्यापीठ स्थापन झालं तेव्हा त्याच्या पहिल्यावहिल्या नियामक मंडळावर नाना एक सदस्य म्हणून नेमले गेले.

नाना आणि एल्फिनस्टनं मातृभाषेत शिक्षण दिलं जावं म्हणून आग्रही असत. म्हणूनच मराठी, गुजराती आणि हिंदी भाषांमध्ये प्रथमच क्रमिक पाठ्यपुस्तक छापली गेली. त्यामुळे आधुनिक शिक्षणाची कवाडं सर्वांना खुली झाली. एल्फिन्स्टन इंग्लंडला परत जाण्यासाठी १८२७ साली निघाले तेव्हा त्यांच्या सत्कारासाठी जो निधी गोळा केला गेला त्यातून एल्फिन्स्टन कॉलेज आणि शिक्षणसंस्था उभ्या झाल्या, याच एल्फिन्स्टन महाविद्यालयातून पुढे शिक्षणाचा वटवृक्ष फोफावला.

मुंबईत १८४५ मध्ये जे.जे. रुग्णालय आणि ग्रँट मेडिकल कॉलेजची स्थापना १८४९ मध्ये एल्फिन्स्टन महाविद्यालय आणि अन्य संस्थांद्वारे एतद्देशीयांसाठी कल्याणशाळा, १८५१ मध्ये सर्वांना संस्कृतचे शिक्षण खुले करणारे पूना संस्कृत कॉलेज म्हणजे आजचे डेक्कन कॉलेज, १८५५ मध्ये पहिले विधी महाविद्यालय, १८५७ मध्ये जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आणि मुंबई विद्यापीठाची स्थापना अशा सर्व महाकार्यामागे नानांचं कर्तृत्व फार उपयुक्त ठरलं.

आज समाजसेवक म्हटलं की लोक तुच्छतेनं त्या व्यक्तीकडे बघतात. मात्र नाना सच्चे समाजसेवक होते. नानांनी समाजाला किती देणग्या दिल्या याचे अनेक संदर्भ आजही सापडतात. मात्र त्यांनी समाजाकडून काहीही घेतलं नाही. भारतातील मुलींसाठी पहिली शाळा सुरु करण्यासाठी आपली एक इमारत त्यांनी दिली. हेच नाना सामाजिक सुधारणा व्हाव्या म्हणून सक्रिय असले तरी आपला धर्म आणि परंपरा यांच्याबाबत विलक्षण आग्रही असत याचं एक उदाहरण म्हणजे मरीन लाईन्स इथल्या हिंदी दहनभूमीतील धुरामुळे त्रास होत असल्यानं ती अन्यत्र हलवावी अशी मागणी गोऱ्या सोजिरांनी केल्यानंतर ती पूर्ण करण्याचा मनसुबा मुंबईच्या गव्हर्नरनं व्यक्त केला. तेव्हा ठाम भूमिका घेऊन नानांनी हे घडू दिलं नाही.

नाना प्रत्येक सामाजिक कार्यात आघाडीवर असत. परंतु इंग्रज सरकारच्या जुलमाचा रेटा वाढू लागला तसं नानांच्या पुढाकारानं १८५१ साली बॉम्बे असोसिएशन स्थापन झालं. सरकारचे निर्णय पडताळतानाच समाजानंही आधुनिकतेची कास धरावी असा दुहेरी उद्देश ही संघटना स्थापन करताना होता. नानांचं तिचे अध्यक्ष बनले. देशात प्रत्येक इलाख्यात कायदेमंडळ स्थापन करण्याची प्रक्रिया सुरु झाली तेव्हा मुंबई इलाखा विधानपरिषदेवर नाना नेमले गेले. सनदशीर आणि अहिंसक संघर्ष हे प्रथमपासूनच नानांचं ब्रीद होतं. ब्रिटीश अधिकारी आणि पार्लमेंट यांना कोणत्या प्रकारे आपलं म्हणणं मान्य करण्यास भाग पाडावं याचा त्यंना अचूक अंदाज असे. त्यामुळे नानांनी केलेल्या मागण्यांकडे सरकारला सहज दुर्लक्ष करणं शक्य नसे.

तेव्हाच्या वर्णनावरुन असं दिसून येतं की, नानांची देहयष्टी भव्य होती. पण त्यांची वाणी सौम्य होती. नानांच्या दानशूरपणाच्या कथा प्रसिद्ध होत्या. त्यामुळे अनेक नागरिक त्यांची भेट घेत असत आणि ती सहज होऊ शकत असे. एखाद्याची अडचण रास्त वाटल्यास त्याला मदत मिळू शके. त्यामुळे नानांचा हा प्रभाव वापरुन सरकारनं सामाजिक सुधारणा करताना लोकांचं सहकार्य मिळवलं. नाना आहेत म्हटल्यावर इथल्या समाजानं या सुधारणा बिनतक्रार स्वीकारल्या. मात्र त्यामुळेच मुंबईतल्या प्रत्येक सार्वजनिक प्रकल्पात त्यांचा सहभाग अनिवार्य ठरला.

आता जगप्रसिद्ध असलेल्या राणीच्या बागेची (जिजामाता उद्यान) कल्पना त्यांचीच. ती आरंभी शिवडी-वडाळा इथं होती. नंतर ती भायखळा इथं आणण्यात आली. तिचं उद्घाटन झालं त्यावेळी नानांना व्यासपीठावर गव्हर्नरनं मानाचं स्थान दिलं होतं.

नानांच्या जीवनातील एकमेव किटाळ म्हणजे १८५७ च्या उठावानंतर त्यांच्यावर आलेला वहीम. या उठावामुळे देशभर मोठे हादरे बसले आणि संशयाचं धुकं निर्माण झालं. सर्वत्र धरपकड झाली. मुंबईतही किंचितसा परिणाम झाला पण त्याचे फार पडसाद उमटले नाहीत. आताच्या आझाद मैदानात दोन कथित बंडखोरांना जाहीरपणे फाशी चढवण्यात आलं. नानांचा या उठावास छुपा पाठिंबा असल्याचा वहीम आला आणि त्यांची चौकशीही करण्यात आली. तथापि त्यातून काहीच निष्पन्न झालं नाही. उलट नानांची प्रतिमा आणखी झळाळून उठली. त्यानंतर मात्र सरकारनं त्यांचा कायम गौरवच केला.

मुंबई शहराची भरभराट आणि विकासामध्ये नाना शंकरशेट यांचा वरदहस्त सतत लाभत आला आहे. मुंबईतील पहिली रेल्वे १६ एप्रिल १८५३ रोजी धावली. त्याचप्रमाणे बॉम्बे स्टीम नेव्हिगेशन कंपनीची स्थापना, पहिलं नाट्यगृह, महापालिका, बँक आणि मुंबईत सार्वजनिक ठिकाणी गॅसबत्तीची सोय त्यांच्याच प्रयत्नानं झाली.

आपल्या देशातील काही अयोग्य चालीरिती अशा होत्या की त्यामुळे निर्बल समाजावर अन्याय होत असे. त्यातील एक म्हणजे सतीची प्रथा बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांनी सतीच्या अमानुष प्रथेविरुद्ध सरकारनं हस्तक्षेप करावा यासाठी प्रयत्न केला होता. नाना शंकरशेट यांनी त्यास पाठिंबा देत पार्लमेंटकडे अर्ज करुन या प्रथेचं उच्चाटन करण्याची विनंती केली होती.

नाना विविध कार्यांसाठी सढळ हस्ते देणग्या देत असत. त्यांना मुंबईचा दानशूर या बिरुदान ओळखलं जाई. एशियाटिक सोसायटी, राणी बागेतील वस्तुसंग्रहालय, मुंबई विद्यापीठ अशा अनेक संस्थांना त्यांनी देणग्या दिल्या. मात्र त्यांची अजरामर झालेली देणगी म्हणजे अत्यंत प्रतिष्ठित जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती शालांत परीक्षेत संस्कृत विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास ती दरवर्षी देण्यात येते. आजही ती प्राप्त करण्यासाठी तीव्र स्पर्धा असते.

नाना शंकरशेट यांचं योगदान इतक महान होतं की कृतज्ञ मुंबईकरांनी लोकवर्गणी काढून त्यांची एक पूर्णाकृती अप्रतिम प्रतिमा इंग्लंडमध्ये संगमरवरात घडवून मुंबईत आणली. आज नानांचा हा पुतळा एशियाटिक सोसायटीच्या तळघरात स्थापन करण्यात आला आहे.

धरणात बुडालेले प्राचीन भोइघर गाव

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील कोलमांडला, दांडा, आणि भोईघर ही गावे एक हजार वर्षे जुनी आहेत हे कोणालाही सांगून खरे वाटणार नाही. फणसाड या अभयारण्यात एक धरण आहे. हे धरण जेव्हा बांधले तेंव्हा या भागातून एक गाव विस्थापित झाले त्याचे नाव भोईघर. भोईघर हे मुरूडच्या उत्तरेस साधारण पंचवीस किलोमीटर अंतरावर आहे. पूर्वी जंजिरा संस्थानमध्ये असलेले हे गाव डोंगर उतारावर वसले होते. मुरुड-जंजिरा संस्थानाच्या काळात

या गावातील श्री. नातू नावाच्या गृहस्थांच्या शेतात खणत असताना त्यांना संस्कृत भाषेतील व देवनागरी लिपीतील एक ताम्रपट सापडला. त्या सोबतच काही नाणीही सापडली होती. या ताम्रपटात वरील गावंचे उल्लेख येतात.

हा ताम्रपट मुरुड येथील अधिकाऱ्यांकडे पाठविला गेला. त्याचे पुढे काय झाले समजत नाही. कोकणात पूर्वी कागदांचे दुर्भिक्ष असे व येथील हवेत ते टिकतही नसत त्यामुळे हा ताम्रपट पाठवण्यापूर्वी संस्कृतचे जाणकार व विद्वान असल्याने स्वतः श्री. नातू यांनी तो ताम्रपट मुखोद्गत केला. पुढे जंजिरा संस्थानचे सरन्यायाधीश श्री. राजाध्यक्ष हे भोईघर गावी गेले असता नातूनी तो त्यांना पाठ म्हणून दाखविला. राजाध्यक्षांनी तो लिहून घेऊन मुंबईच्या प्रा. वेलणकर यांकडे पाठविला. हेच वाचन डॉ. मो. ग. दीक्षित यांनी आपल्या शिलालेख व ताम्रपट या पुस्तकात जसेच्या तसे छापले. या ताम्रपटातून खूपच महत्वपूर्ण आणि शिलाहार घराण्याच्या इतिहासात भर टाकणारी माहिती पुढे आली. हा ताम्रपट पुढे भोईघर ताम्रपट म्हणून इतिहासात प्रसिद्ध झाला.

हा ताम्रपट शिलाहार राजघराण्यातील श्रीस्थानक म्हणजे आजचे आपले ठाणे येथून संपूर्ण कोकणवर राज्य करणाऱ्या राजाने दिला आहे. ताम्रपट शिलाहार नृपति छित्तराजाचा असून त्याची तिथी भाद्रपद वद्य १३ गुरुवार शके ९४६ ही असून ती सध्याच्या ७ सप्टेंबर १०२४ या इंग्रजी तारखेस जुळते, म्हणजेच हा ताम्रपट तब्बल एक हजार वर्षापूर्वीचा आहे. सन २०२४ मध्ये त्याला बरोबर एक हजार वर्षे होतील. ताम्रपटातील माहितीनुसार छित्तराजाने चिपळूण येथून आलेल्या एका विद्वान कऱ्हाडे ब्राम्हणाला करदांड म्हणजे आजचे दांडे आणि कोलपल्लिका म्हणजे आजचे कोल-मांडला या गावांतील काही बागा किंवा वाडी व त्यांचे उत्पन्न दान दिले होते. आजच्या मुरुड तालुक्याचा मोठा भाग हा 'पाणाड' म्हणजे आजच्या पोयनाड या जिल्ह्यासारख्या पोटविभागात अंतर्भूत होत असे आणि या जिल्ह्यासारख्या पोटविभागाला 'विषय' असे म्हणत. या ताम्रपटात काही राजमंत्र्यांची देखील नावे आली आहेत.

भोईघर गावात सध्या हनुमान व बापदेवाचे

मंदिर आहे. संपूर्ण गाव स्थलांतरित असल्याने येथे कोणतेही महत्त्वपूर्ण शिल्पावशेष आढळून येत नाहीत. फणसाड धरणात असलेल्या त्यातील एका टेकडीवर गणेश मंदिर होते, त्यातील गणेश प्रतिमा बाहेर काढून फणसाड धरणाजवळील मंदिरात ठेवण्यात आली आहे. सध्या ही प्रतिमा तैलरंगाने रंगविलेली आढळते. ही मूर्ती शिल्पशैलीवरून मराठा कालखंडातील वाटते.

नाही म्हणायला भोइघर गावाच्या उत्तर दिशेस या गावाचाच भाग असलेले बेलवाडी येथे विशेष उल्लेखनीय अवशेष आहेत. येथे जीर्णोध्दार झालेले शिवमंदिर असून मंदिरात आधुनिक काळातील नंदी प्रतिमा असली तरी गर्भगृहात मात्र मूळ शिवलिंग आहे. यातील लिंग आणि योनीपीठ भाग वेगवेगळा आहे. याशिवाय मंदिराशेजारील वडाच्या झाडाखाली आयताकार अशा तीन फुट लांब व एक फुट रुंद आकाराची एक काळ्या दगडातील कोरीव शिळा असून, तिचा शिरोभाग अर्धवर्तुळाकृती असून त्या भागात मंगल कलश कोरला आहे. मंगल कलशावर झाकणी ठेवली असून, कलशाच्यामधील भागात एक फीत बांधली असून तिच्या फुगीर कलशाच्या दोन्ही बाजूस सोडलेल्या आहेत. त्या कलशाच्या खाली चौकट खोदली असून या चौकटीत एक जोडपे दाखविले आहे. उभ्या असलेल्या व्यक्तीपैकी डावीकडील व्यक्तीच्या उजव्या हातात एखादे शस्त्र असून ते त्याने आपल्या खांद्यावर पेलले आहे. डाव्या हातात ढाल उसावी. उजवीकडील व्यक्तीने आपले हात जोडले असून ही व्यक्ती बहुदा स्त्री असावी. या चौकटी खाली लेख कोरण्यासाठी सपाट करून मोकळी जागा सोडलेली दिसते. सध्या त्यावर लेख दिसून येत नाही. एकंदर शैलीवरून हे शिल्प अकराव्या किंवा बाराव्या शतकातील असावे. शिवमंदिरा भोवती नांगरताना जागेत लाल खापरांचे अवशेष सापडतात. यात झाकण्यांचा व पाणी पिण्याच्या कपांचा समावेश आहे.

धरणाच्या वरच्या भागात धावीर या देवतेचे मंदिर असून येथे उगम पावलेल्या नदीवरच धरण बांधलेले आहे. ही नदी पुढे समुद्रास बोर्ली येथे मिळते. याच्या दक्षिण बाजूस कोलमांडले गाव वसले आहे. अशा या एक सहस्त्रक पूर्ण करणाऱ्या गावांनी आपल्या गावाचा वर्धापनदिन येत्या सन २०२१ मध्ये येणाऱ्या ७ सप्टेंबर या दिवशी करण्यास हरकत नाही.

(लेखक इतिहास अभ्यासक व पुरातत्वज्ञ आहेत.) anjayshankargmail.com

९७६३१११११११

कोकण भूमी
डॉ. अंजय शं. धनावडे

माओंची ऐतिहासिक उडी

चीनच्या वूहान शहरांत १६ जुलैला वार्षिक यांगच जलतरण महोत्सव पार पडला. यामध्ये यंदा फक्त ५२ स्पर्धक सहभागी झाले होते. दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धेत हजारो स्पर्धक सहभागी होतात. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे गेल्या वर्षी आणि यंदा ही स्पर्धा सीमित ठेवण्यात आली. स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांची आरोग्य तपासणी करण्यात आली आणि मगच त्यांना सहभागी होण्याची संमती देण्यात आली. यांगच ही चीनमधील लांबीला अधिक असलेली नदी आहे. मध्य चीनमध्ये असलेल्या वूहान शहरांत दरवर्षी ही जलतरण स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेचं वैशिष्ट्य म्हणजे १६ जुलै १९६६ ला अध्यक्ष माओ त्से तुंग यांनी वूहान शहरात यांगच नदीच्या खोऱ्यात उडी मारली होती. चीनच नेतृत्व करण्यास आपण अजूनही समर्थ आहोत हे दाखवण्यासाठी माओनी यांगच नदीमध्ये उडी मारली होती आणि त्यानंतर चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीला सुरुवात झाली. सांस्कृतिक क्रांतीचे पडसाद १० वर्ष चिनी नागरिकांना सोसावे लागले.

इतिहासात डोकावून पाहिलं तर नदीत उदीमारून पात्र पोहून जाणं याचा राजकीय क्रांतीशी संबंध असल्याचं जाणवतं. जनरल ज्युलिअस सिजर रुबीकॉन नदी पोहून गेला होता आणि त्यानंतर रोममध्ये यादवी युद्धाला सुरुवात झाली. वॉशिंग्टन डेलावेअर नदी पोहून गेले होते आणि त्यानंतर अमेरिकेत क्रांती झाली. माओ त्से तुंग यांनी १९६६ मध्ये यांगच नदीत उडी मारली आणि त्यानंतर सांस्कृतिक क्रांती झाली.

माओंच वय झालं असल्याने ते निवृत्त झाल्याच्या अफवा त्यावेळी पसरवल्या जात होत्या त्या अफवा खोट्या असून माओ अजूनही धडधाकट आहेत आणि चीनच नेतृत्व करण्यास ते सक्षम आहेत हे दाखवण्यासाठी मोनी १६ जुलैला वूहानमध्ये यांगच नदीत उडी मारली होती. शरीर सक्षम असणं याला फार महत्त्व असल्याचं माओंनी त्यांच्या एका जुन्या लेखात स्पष्ट केलं आहे. १९१७ साली छिन छिंग निअन किंवा न्यू युथ या नियतकालिकात शारीरिक शिक्षण या विषयावर एक लेख लिहिला होता. हा लेख सांस्कृतिक क्रांतीच्या बराच आधी आणि चिनी कम्युनिस्ट पक्ष स्थापन होण्याच्या काही वर्ष आधी प्रसिद्ध झाला होता. त्यामध्ये त्यांनी बुद्धी आणि शारीरिक क्षमता मानवी कृतीशी कशा निगडित आहेत हे त्यांनी विशद केलं होत. या लेखात त्यांनी म्हंटल होतं की, मानव हा बुद्धिमान प्राणी आहे, त्याच्या कृतीला महत्त्व आहे. त्यामुळे त्याच्या प्रत्येक कृतीमागे काहीतरी कारण असणं गरजेचं आहे. माओनी त्यांच्या या तत्वाचा आयुष्यभर पालन केलं. त्यांनी त्यांच्या प्रत्येक कृतीला महत्त्व दिलं आणि त्यांची प्रत्येक कृती ही त्यांच्या तत्वांवर आधारित होती.

विशेष
श्रद्धा वार्डे

पोहणं हा माओंचा आवडता व्यायाम होता. किशोर वयामध्ये ते हिवाळ्यात थंड नदीच्या पाण्यात व्यायाम म्हणून पोहायला जायचे. त्यांनी त्यांच्या या व्यायाम प्रकारचा उपयोग राजकारणासाठी करायला सुरुवात केली. ते यासाठी तीन नद्या पोहून गेले. कुआंगचो शहराजवळील पर्ल नदी, चांगशा मधील शियांग नदी आणि वूहान मधील यांगच नदी. माओंची नदीत पोहण्याची कल्पना त्यांच्या सल्लागारांना कधीच आवडली नाही. माओंची खाजगी डॉक्टर ली चिरसुईने अध्यक्ष 'माओंच खाजगी आयुष्य' या पुस्तकात म्हटलं आहे की, माओ जेव्हा अशी कृती करायचे तेव्हा माओना काही होईल का किंवा ते नदीत बुडणार तर नाही ना अशी भीती त्यांचे सुरक्षा रक्षक आणि अधिकाऱ्यांना वाटायची. पण माओना कोणी रोखू शकलं नाही.

जेव्हा पहिल्यांदा त्यांनी पर्ल नदीमध्ये उडी मारली तेव्हा डॉक्टर ली ला नदीच्या पाण्याची चाचणी करायला सांगण्यात आलं होतं. कारण कुआंगचो मधील कंपन्यांचं सांडपाणी आणि शहरातील सांडपाणी हे पर्ल नदीमध्ये सोडलं जात होतं. पण माओना याने काही फरक पडला नाही. त्यांनी नदीमध्ये उडी मारली आणि त्यानंतर डॉक्टर आणि त्यांच्या सुरक्षा रक्षकांनी पण नदीत उड्या मारल्या. पर्ल नदीमध्ये मानवी विष्ठा आणि कारखान्यांचा कचरा तरंगत होता. पण माओना याचा काही फरक पडला नाही. एखाद्या सोफ्यावर पडल्याप्रमाणे ते पाण्यात उताणे पडून होते.

माओ १९५६ ते १९६२ दरम्यान ११ वेळा यांगच नदी पोहून गेले. त्यांनी त्यांच्या १९१७ च्या लेखात लिहिलं होतं की, विद्यार्थी बौद्धिक क्षमतेला महत्त्व देतात आणि शारीरिक सक्षमतेकडे दुर्लक्ष करतात. माओना आळशी नोकरहशहा बनायचं नव्हतं, एक क्रियाशील नेता अशी स्वतःची छबी निर्माण करायची होती. त्यामुळे नदीत पोहणं हा त्यांच्या याच कृतीचा भाग होता. १९६६ मध्ये यांगच नदीमध्ये उडी मारणं यामधून तेच प्रतीत होतं.

माओंची ग्रेट लीप फॉरवर्ड किंवा लांब उडी ही योजना फासल्यामुळे, तंग शियाव पिंग आणि लिऊ शाव कि यांच्यासारखे नेते त्यांच्यावर नाराज होते. त्यामुळे माओना मुख्य प्रवाहातून बाजूला करून फक्त पक्षाचं नामधारी प्रमुख करण्यात आलं आणि काही अधिकार देण्यात आलं. याची सुरुवात १९६६ मध्ये झाली. माओंच वय झालं असल्यानं ते योग्य निर्णय घेऊन शकत नाहीत असा पण एक प्रचार त्यावेळी केला जात होता. त्यामुळे माओना त्यांचे हिरावून घेतलेले अधिकार परत मिळवायचे होते आणि कोणताही निर्णय घेण्यास आपण सक्षम आहोत हे सिद्ध करायच होतं. त्यामुळे त्यांनी १६ जुलैला यांगच नदीमध्ये उडी मारली. अजूनही आपला प्रभाव आहे हे दाखवण्यासाठी त्यांनी सांस्कृतिक क्रांती चीनमध्ये घडवून आणली. पण त्यामुळे ग्रेट लीप फॉरवर्ड मध्ये जस चीनच मोठं नुकसान झालं तसंच नुकसान सांस्कृतिक क्रांतीमध्ये पण झालं.

माओंच्या या ऐतिहासिक उडीची दखल पीपल्स डेली या कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्राने वेगळीच घेतली. पीपल्स डेली ने दिलेल्या बातमीमध्ये, माओ एका तासात नऊ मैल पोहून गेले असा दावा केला. माध्यम तज्ज्ञ डेविड बंदुर्स्की याने या विषयांत उडी घेतली आणि हा दावा कसा फोल आहे हे सिद्ध केलं.

चीनचा ऑलम्पिक पटू सून यांग याने २०१२ मध्ये जलतरणात सुवर्ण पदक पटकावलं. २०११ मध्ये सुनने १५०० मीटर अंतर १.७ मीटर प्रति सेकंद या गतीने पार केलं आणि विश्वविक्रम केला. पण माओंच्या पोहण्याची गती मात्र प्रतिसेकंद ३.८ मीटर इतकी होती. यांगच नदीच्या प्रवाहात प्रति सेकंद ३ मीटर पोहून जाण अशक्य असल्याची टीका अनेक अभ्यासकांनी केली. एका तासात नऊ मैल पोहून जाण्यासाठी माओना सून यांग पेक्षा दहा पट अधिक गतीने पोहणं आवश्यक होत. त्यानंतर माओनी परत यांगच नदीमध्ये परत उडी मारली नाही. पण १९६६ मध्ये त्यांनी बीजिंगच्या चोंगनानहाय मधील निवासस्थानी मुक्काम हालवला आणि त्याठिकाणी असलेल्या त्यांच्या खाजगी स्विमिंगपूल मध्ये ते सांस्कृतिक क्रांतीच्या काळात रोज पोहायला जात होते. १६ जुलै १९६६ ला माओ त्से तुंग यांनी यांगच नदीमध्ये मारलेल्या उडीची आठवण म्हणून दरवर्षी या दिवशी जलतरण स्पर्धा घेतली जाते.

अरुण स्टोअर्स नि मयूर बेकरी... एक दृढ नातं

आतापर्यंत लिहिलेल्या अनेक लेखांमधून मी काही आठवणी आपल्याबरोबर शेअर केल्या. दर शनिवारी दै. कृषीवलमधून त्या प्रसिद्ध होत आहेत. माझा व्यवसाय, माझे ग्राहक, माझे अनुभव असे विषय होते. आज मात्र मीच ज्यांचा ग्राहक होतो म्हणजे ज्यांच्याकडून मला सामान येई त्या अलिबागच्या 'मयूर बेकरी' बद्दलची ही आठवण... खास तुमच्यासाठी !

आठवण
विलास अंमेळ

अलिबागची वैशिष्ट्य कोणती असा विषय निघाला की, अगदी पटकन तोंडात नाव येतं ते अर्थातच मयूर बेकरीचं. साधारण चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वी अगदी छोट्याशा स्वरुपात नि जागेत सुरु झालेली ही बेकरी मोठ्या आणि शानदार इमारतीत गेली असली तरी लोकांना तीच चव, तेच समाधान त्यातील कोणतीही वस्तू खाताना मिळते. विद्या पाटील यांनी सुरू केलेल्या या बेकरीत सुरुवातीला ब्रेड, खारी, टोस्ट, मावा केक अशी मोजकीच उत्पादने होती. मला आठवतंय त्याकाळी मुंबईच्या ब्रिटानिया, मॉडर्न अशा कंपनीचे ब्रेड प्रिंटेड वॅक्स पेपरमध्ये यायचे पण मयूरचा ब्रेड साध्या पांढऱ्या प्लॅस्टिक पिशवीत यायचा. माझ्या दुकानात मी त्याची विक्री करत असे. चाळीस वर्षांपूर्वी चोंढी आणि आजुबाजूच्या गावात भाकरी चपाती खाणारे लोक असताना 'ब्रेड' ही वस्तू तशी नवलाईचीच. पण RCF च्या प्रकल्पामुळे काही नवीन माणसं येत होती त्यांच्यासाठी ब्रेड लागायचा म्हणून दहा बारा ब्रेड आणि खारी टोस्ट असं थोडं थोडं मागवायचो. अलिबागहून एस टी ने रोज दुपारी ते यायचं. कधी मावा केक तर कधीतरी बर्थडे केक ऑर्डर नुसार आणायचो. तेव्हा मोजकेच प्रकार बनणाऱ्या बेकरीत आता एवढी प्रॉडक्ट्स तयार होत आहेत की, सर्वांची नावं सांगणंही जमणार नाही. तशीच एक गोष्ट मयूर बेकरीचे वेगळेपण दाखवणारी, ती म्हणजे सुरुवातीपासून आजपर्यंत ग्राहकांना कॅरीबॅग न देण्याची परंपरा तशीच आहे.त्यानिमित्ताने पर्यावरणाला हातभार लावण्याचं कार्य चालू आहे.

एक अतिशय महत्वाची आणि 'गोड' आठवण म्हणजे १९८७ साली माझ्या लग्नाच्या दहाव्या वाढदिवसाला मोठ्ठा म्हणजे माझ्या घरातील टिपॉयवर सुद्धा राहत नव्हता असा केक विद्याताईंनी बनवून दिला होता. त्या केकसह आम्हा उभयतांचा फोटो सोबत दिसतोय. अनेक वर्षे मयूर बेकरी बरोबर माझे व्यावसायिक संबंध होते. ते संपल्यानंतरही मैत्रीचं नातं तसंच राहिलं. आज मी नवी मुंबई येथे राहत असलो तरी मी, माझी मुलं, माझ्या सुना अलिबागला गेल्यावर आवर्जून मयूर बेकरीत जातो आणि काहीना काही घेऊन येतोच. त्यावेळी जुन्या साऱ्या आठवणी डोळ्यासमोर उभ्या राहतात नि मन भूतकाळात हरवून जातं.

८८७९००५८५८

'हिडन' वेबसिरीज मधील 'इन्स्पेक्टर गजरे'कायम स्मरणात राहील!

-अभिनेता रोहित परशुराम

आपल्या नावातच वेगळेपण असलेला आणि पिळदार भक्कम शरिरयष्टी सोबत आकर्षक पेहराव परिधान करून इंडस्ट्रीचं लक्ष वेधण्यात यशस्वी होत असलेला युवा अभिनेता म्हणजेच रोहित परशुराम! 'पिंग पाँग एंटरटेन्मेन्ट'ची बहुचर्चित हिंदी वेबसिरीज 'हिडन' मध्ये एक जबरदस्त व्यक्तिरेखा साकारत आहे. अभिनेता संतोष जुवेकर यांची एसीपी प्रदीप राजे ही प्रमुख भूमिका आहे. त्यांच्या सोबत रोहितने राजेंच्या विश्वासू सहकाऱ्याची इन्स्पेक्टर 'गजरे'ची भूमिका केली आहे. रोहितने या भूमिकेसाठी विशेष मेहनत घेतली आहे. त्याने या व्यक्तिरेखेसाठी तब्बल ७ किलो वजन वाढवून हा 'गजरे'चा बेरकीपणा अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. 'हिडन' १६ जुलैला 'पिंग पाँग' ओटीटी वर रुजू होत आहे, त्यानिमित्ताने रोहित सोबतचा हा संवाद..

प्रश्न : रोहित तुझं 'रोहित परशुराम' हे खरं नाव आहे?



चित्रपट
राम कोंडीलकर

रोहित : एकदम ॲक्सीडेन्टली मी या क्षेत्रात आलो आहे. मी नॅशनल लेव्हलचा बॉडी बिल्डर आहे. २०१७ सालची राष्ट्रीयस्तरावरील 'बॉडी बिल्ड' स्पर्धा खेळलो आहे. या स्पर्धेद्वारे मी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. २०१८ साली जिममध्ये माझ्या मित्राचा दिग्दर्शक मित्र चित्रपटातील निगेटिव्ह कॅरेक्टरसाठी रांगडा लूक असलेला चेहरा शोधात असल्याचे सांगितले. मी माझ्या ओळखीत कोणी असेल तर कळवितो असे म्हणालो, मात्र मित्राने सांगितले दुसरा कोणी नको तूच चल ऑडिशनला. मी नाटकात अभिनय केला असला तरी माझं ध्येय राष्ट्रीय बॉडी बिल्डर होण्याचं असल्याचं सांगूनही त्याने खूप आग्रह धरला आणि मी ऑडिशनला गेलो. मात्र त्या ऑडिशनमध्ये मी रिजेक्ट झालो. आणि रिजेक्ट होण्याचं कारण माझी बॉडी होती. दिग्दर्शकाने सांगितले की फिल्म इंडस्ट्रीत इतकी बल्की बॉडी चालत नाही. ही ऑडिशन दिल्यावर मला या क्षेत्राविषयी आकर्षण वाटू लागलं. मला चित्रपटात काम करायचं झालं तर आपलं शरीर कमी करायला हवं हे मनात पक्कं झालं आणि तीन महिन्यात मी १६ किलो वजन कमी केलं. याच चित्रपटासाठी तीन महिन्यानंतर ऑडिशन दिली आणि मी सिलेक्ट झालो तो चित्रपट होता मिथुन आणि निर्माते होते जीवन बबनराव जाधव.

प्रश्न : अभिनयाच्या क्षेत्रात तुझा कोणी गुरु आहे काय?

रोहित : हो, मी विक्रम गोखले सरांचा विद्यार्थी आहे. त्यांनी केलेले मार्गदर्शन माझ्यासाठी विशेष आहेत.

प्रश्न : भूमिका निवडताना आणि ती साकारताना तू काय काळजी घेतोस?

रोहित : ॲक्टिंग म्हणजे एक थॉट प्रोसेस असते. भूमिका किती लांबीची आहे त्यापेक्षा ती किती महत्वाची आहे हे मी पाहतो. व्यक्तिरेखा ऐकल्यानंतर मी तिच्या अंतरंगात घुसून ती माझ्यात पुरेपूर भिनवून घेतो. तिचं बारकाईने निरीक्षण केल्यानंतर आपसूकच त्या व्यक्तिरेखेत नैसर्गिक रंग भरले जातात.

प्रश्न : हिडन मधला गजरे नेमका कसा आहे?

रोहित : अत्यंत बेरकी. मी केलेल्या इतर व्यक्तिरेखांपेक्षा अत्यंत वेगळा आहे. तो वांद्रे पोलीस ठाण्यात इन्स्पेक्टर आहे. ८/१० वर्षांची त्याची सर्व्हिस आहे. त्यामुळे साहजिकच थोडं पोक्त आहे. बल्कीपणा आणण्यासाठी मी माझं वजन ६-७ किलोने वाढवलं आहे. एसीपी राजेंच्या टीममध्ये हा एक मनमौजी अतरंगी इन्स्पेक्टर म्हणता येईल. दिग्दर्शक विशाल सावंत सरांनी मला ही व्यक्तिरेखा करण्यासाठी बरंच फ्रिडम दिल्याने या व्यक्तिरेखेचे विविध पैलू शोधात आले. चॅनेल कडून चेतन डिके सरांचेही सतत मार्गदर्शन मिळत असते आमच्या बऱ्याचदा चर्चा होत असतात. त्यातूनही काही गोष्टी सापडतात.

प्रश्न : चित्रपट, मालिका क्षेत्रातील तुझा इतर अनुभव कसा आहे?

रोहित : अत्यंत वेगळा. विक्रम गोखले सरांच्या समृद्ध अभिनयाचे बाळकडू सोबत माझी वाचनाची आवड यामुळे मला करायला मिळणाऱ्या व्यक्तिरेखा समजून घेण्यास मदत होते. मिथुन चित्रपटातील प्रमुख निगेटिव्ह व्यक्तिरेखेनंतर चांगलं काम मिळविण्यासाठी थोडा स्ट्रगल केला. मात्र लगेच मला स्वस्तिक प्रॉडक्शन्सच्या हिंदी 'राम सिया के लवकुश' व देवी आदि पराशक्ती या हिंदी मालिकांमध्ये लीड निगेटिव्ह कॅरेक्टर रोल करण्याची संधी मिळाली. 'मिथुन', 'रघु ३०५', या मराठी चित्रपटांमध्ये प्रमुख खलनायक रंगविता आला. तसेच वडील आणि मुलाच्या नात्यावरील आगळ्यावेगळ्या 'आर बा' या चित्रपटात नायकाची व्यक्तिरेखा करतोय. तसेच अनेक छान छान वेबसिरीज करता आल्या. 'हिडन' गजरेमुळे वेगळी ओळख तयार करण्याचा प्रयत्न केलाय, ट्रेलर पाहून भन्नाट प्रतिक्रिया येत आहेत.

बालांगण

शीन किकिंग आणि स्नो पोलो

फन टाईम

कुस्ती, बॉक्सिंगसारख्या खेळांबद्दल तुम्ही ऐकलं असेल. याच पद्धतीचा एक खेळ म्हणजे शीन किकिंग. शीन म्हणजे पायाचा पुढचा भाग. या खेळात समोरच्या खेळाडूच्या पायावर जोरात लाथ मारून त्याला खाली पाडायचं असतं. या खेळात जिंकण्यासाठी तुम्ही चपळ असायला हवं. वेदना सहन करण्याची ताकदही तुमच्याकडे हवी. शीन किकिंगचा उगम इंग्लंडमधला. त्यामुळे या खेळाला 'इंग्लिश मार्शल आर्टस' असंही म्हटलं जातं. दरवर्षी जागतिक शीन किकिंग अजिंक्यपद स्पर्धेचं आयोजन केलं जातं.

पोलो हा खेळ तुम्हाला माहीत असेल. घोड्यावर बसून खेळायचा हा खेळ आहे. स्नो पोलो बर्फाळ पृष्ठभागावर खेळला जातो. हिवाळ्यात अनेक ठिकाणचे तलाव गोठतात. या गोठलेल्या तलावांवरही स्नो पोलोचं आयोजन केलं जातं. काही दशकांपूर्वी युरोपमध्ये या खेळाची सुरूवात झाली. स्नो पोलोसाठीच्या मैदानाचा आकारही नेहमीच्या पोलोइतकाच असतो. मैदानाच्या दोन्ही बाजूंना गोल जाळी असते. पोलोमध्ये वापरतात तशाच काठ्या या खेळासाठीही वापरल्या जातात. स्नो पोलोसाठी वापरल्या जाणाऱ्या बॉलचा आकार थोडा मोठा असतो तसंच तो रंगीतही असतो. या खेळात चार जणांचे दोन संघ सहभागी होतात. बर्फावर धावण्याच्या दृष्टीने घोड्यांना तयार केलं जातं. स्नो पोलोच्या विश्वचषक स्पर्धेचं आयोजन केलं जातं.

असं सुधारा इंग्रजी

स्टडी टिप्स

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय स्तरावर बोलली जाणारी भाषा असल्यामुळे ती अवगत करुन घ्यायला हवी. या भाषेत प्राविण्य मिळवण्यासाठी काय करता येईल याविषयी...

✻ इंग्रजीत संवाद साधण्यासाठी सतत इंग्रजी बोलत रहा. वाक्य उच्चारताना तसे हावभावही करा. म्हणजे बिग हा शब्द उच्चारताना दोन्ही बाजूंना हात पसरवा. यामुळे शब्द लक्षात रहायला मदत होईल.

✻ नवी भाषा शिकणं हे नवी सवय लावून घेण्यासारखं असतं. शब्द आणि वाक्य नीट बोलता यावी यासाठी ती भाषा कानांवर पडणंही गरजेचं असतं. यासाठी इंग्रजी वाहिन्या बघा. इंग्रजी बातम्या ऐका. चांगले इंग्रजी चित्रपट बघता येतील. इंग्रजी कॉमेंट्रीही ऐकता येईल. यामुळे वाक्यरचना कशी करायची, कोणते शब्द कुठे वापरायचे हे कळेल.

✻ वर्गातल्या मित्रमैत्रिणींचा ग्रुप करा. एखादा विषय निवडून त्यावर चर्चा करा. एखादी गोष्ट सांगा. आवडत्या विषयावर इंग्रजीत गप्पा मारा. मित्रमैत्रिणींसमोर बोलताना अवघडल्यासारखंही वाटणार नाही. यामुळे बोलण्याचा सराव होईल. आत्मविश्वास वाढेल.

✻ ताई,दादा, आई बाबा किंवा ओळखीत कोणाचं इंग्रजी चांगलं असेल त्यांच्याकडे जा. एखादा विषय निवडून त्यावर बोला. त्या व्यक्तीला चुका काढायला सांगा. व्याकरण किंवा उच्चारात झालेली चूक तुम्हाला कळेल आणि सुधारणा करता येईल. याबरोबरच इंग्रजी वाचन वाढवा. पेपर, पुस्तकं वाचा. यामुळे इंग्रजी सुधारेल.

आता आलं स्पीकरवालं मास्क

स्मार्ट टॉक

दोस्तांनो, सध्या बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे मास्क पहायला मिळतात. आता तर हायटेक मास्कही दाखल होऊ लागले आहेत. मास्कची गरज लक्षात घेऊन विविध कंपन्या शक्कल लढवून हटके मास्क सादर करत आहेत. एलजी या कंपनीनेही प्युरिकेअर फेसमास्क बाजारात आणलं आहे. यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून हे मास्क घाल्यानंतर शुद्ध झालेली हवा आपल्या शरीरात जाईल.

कोणतीही अडचण येणार नाही.

आज मास्क ही गरज असली तरी ते घालण्यात बऱ्याच अडचणी असतात. मास्कमध्ये घुसमटल्यासारखं वाटतं. तसंच खूप घामही येतो. या सगळ्या समस्यांवर उपाय म्हणून अशा पद्धतीचे

अजून एक गंमत म्हणजे या मास्कमध्ये इनबिल्ट माईकही आहे. त्यामुळे तुम्ही फोनवर अगदी आरामात बोलू शकाल. या मास्कमध्ये व्हॉईस ऑन तंत्रज्ञानाचा वापर करून मायक्रोफोन आणि स्पीकर बसवण्यात आले असून यामुळे फोनवर बोलताना कोणतीही अडचण येणार नाही.

नवतंत्रज्ञानाने युक्त मास्क बाजारात दाखल होत अहेत. ही बाब खूपच सकारात्मक आहे. या मास्कचं वजन ९४ ग्रॅम असून त्यात १००० एमएएच क्षमतेची बॅटरी आहे. हे मास्क आठ तास अगदी सहज घालता येतं. हे नवं मास्क आकर्षणाचं केंद्र ठरत आहे.

ठरवा तुमची उद्दिष्टं

हेल्थ वेल्थ

छोट्यांनो, तुम्ही आयुष्यात एखादं ध्येय किंवा उद्दिष्ट ठरवलं आहे का? यावेळी परीक्षेत चांगले मार्क मिळवायचे, नवी भाषा शिकायची, व्यायाम करायचा, स्पेलिंग पाठ करायची असं कोणतंही उद्दिष्ट असू शकतं. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जोरदार सुरूवात केल्यानंतर गाडी मध्येच अडकते. काही तरी चुकतं. ठरवलेलं काहीच होत नाही. यामुळे तुम्ही निराश होता. पण असं तुमच्या एकट्यासोबतच होत नाही. असे अनेकजण असतात. एखाद्या वेळी जमलं नाही तर प्रयत्न लगेच सोडून देऊ नका.

पुन्हा प्रयत्न करा. 'मला जमत नाही' असं म्हणून रडत बसू नका. आयुष्यातलं उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी काय करायला हवं याविषयी...

✻ तुम्हाला नेमकं काय करायचं आहे ते आधी स्पष्ट झालं पाहिजे. समजा, तुम्हाला वजन कमी करून फिट बनायचं आहे. त्यासाठी नेमकं काय करायला हवं हे समजून घ्यायला हवं. यासाठीचा कालावधीही ठरवायला हवा. चार महिन्यात किती वजन कमी करायचं हे ठरवून कामाला लागलं तर निश्चितच चांगले परिणाम होऊ शकतात.

✻ आपल्याला जे जमणार आहे त्याचंच उद्दीष्ट समोर ठेवा. तुम्ही कोणताही खेळ खेळत असलात तरी आधी शालेय संघात स्थान मिळवण्याचं उद्दिष्ट ठेवा. मग चांगली कामगिरी करून पुढे जा. आंतरराष्ट्रीय स्तरावरच संधी मिळायला हवी, असा विचार करू नका. हळूहळू पुढे जा. वास्तववादी उद्दिष्ट ठेवणं गरजेचं आहे.

✻ तुमचं उद्दिष्ट लिहून काढा. पुन्हा पुन्हा लिहून काढा. त्यामुळे ते तुमच्या मनावर ठसेल आणि उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिशेने तुम्ही पुढे जाल.

✻ आयुष्यात कोणताही बदल करताना शिस्त महत्त्वाची असते. त्यामुळे वजन कमी करायचं असो किंवा संघात स्थान मिळवायचं असो; नियमित व्यायाम, आहार-विहाराचे नियम पाळावे लागतील. अंगी शिस्त बाणवावी लागेल. यामुळे तुमचं उद्दिष्ट साध्य होण्यातले अडथळे दूर होतील.

इन्फॉर्मेशन मॅनेजर व्हायचंय?

कोण होणार?

सध्याच्या डिजिटल युगात लायब्ररियन्स इन्फॉर्मेशन मॅनेजर झाले आहेत. लोकांसोबत काम करायला आवडत असेल, माहिती- तंत्रज्ञानाची आवड असेल तर तुम्हीही इन्फॉर्मेशन मॅनेजर बनू शकता.

✻ पुस्तकं सर्व्हरवर योग्य पद्धतीने मांडणं, इंटरनेट सुरक्षेविषयीचं ज्ञान इन्फॉर्मेशन मॅनेजरला असायला हवं. ई-लायब्ररीमध्ये वाचकांपर्यंत माहिती पोहोचवण्याचं काम लायब्ररी मॅनेजर करतो. त्याच्याकडे माहितीच्या सर्व स्त्रोतांची योग्य मांडणी असायला हवी; लायब्ररीशी संबंधित साधनसामुग्रीचं व्यवस्थापन जमायला हवं.

✻ या क्षेत्रात येण्यासाठी वाचनाची आणि लोकांना भेटण्याची आवड हवी. कमी पैशांमध्ये जास्तीत जास्त पुस्तकांचा संग्रह करायला जमायला हवं. नव्या सॉफ्टवेअरची माहितीही हवी. सतत नव्या गोष्टी शिकण्यात रस हवा.

✻ लायब्ररी सायन्समध्ये डिप्लोमा तसंच पीएचडीपर्यंत विविध अभ्यासक्रम करता येतात. इतर विषयात पदवी मिळवल्यानंतरही लायब्ररी सायन्सचा अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. डिस्टन्स लर्निंगचा पर्यायही आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सरकारी लायब्ररी, विद्यापीठं, राजकीय दूतावास, फिल्म लायब्ररी, माहिती केंद्र अशा ठिकाणी नोकरी मिळू शकते.

ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) ऑकलंड हे शहर कोणत्या देशात आहे?
२) व्हॅली ऑफ किंग्ज कुठे आहे?
३) सोन्याच्या खाणींसाठी प्रसिद्ध असलेलं दक्षिण आफ्रिकेतलं शहर कोणतं?
४) मदर्स डे कधी असतो?
५) २०२२ चा फुटबॉल विश्वचषक कुठल्या देशात होणार आहे?
६) सर्वाधिक वेळा फुटबॉल विश्वचषक जिंकलेला देश कोणता?
७) जागतिक आरोग्य दिन कधी असतो?
८) सर्वात मोठा समुद्रपक्षी कोणता?
९) घरटं बांधणारा एकमेव साप कोणता?
१०) मधमाश्यांना पंखांच्या किती जोड्या असतात?

उत्तर : १) न्यूझीलंड २) इजिप्त ३) जोहान्सबर्ग ४) मे महिन्यातल्या दुसऱ्या रविवारी ५) कतार ६) ब्राझील ७) ७ एप्रिल ८) अल्बाट्रोस ९) किंग कोब्रा १०) दोन

मेमरी कार्ड करा दुरुस्त

स्मार्ट टिप्स

सध्याच्या स्मार्टफोनमध्ये बरीच मेमरी असते. पण आपण बरंच काही सेव्ह केलं तर ही मेमरीही संपून जाते. अशा वेळी फोनमध्ये मेमरी कार्ड टाकलं जातं. या कार्डवर बरंच काही सेव्ह केलं जातं. मेमरी कार्ड खराब झालं तर त्यावरचा डाटा मिळू शकत नाही. फोटो किंवा इतर महत्त्वाची माहिती डिलिट होते. मेमरी कार्ड खराब होण्याची अनेक कारणं आहेत. त्याविषयी जाणून घेऊया. तसंच खराब झालेलं मेमरी कार्ड दुरूस्त कसं करायचं हे ही समजून घेऊया.

✻ स्मार्टफोनच्या वापरामुळे मेमरी कार्ड खराब होऊ शकतं. ब्राउजिंग करताना किंवा ॲप्स डाउनलोड करताना फोनमध्ये व्हायरस येतो. यामुळे मोबाईल आणि मेमरी कार्ड खराब होऊ शकतं. अँड्रॉइड ओएस सिस्टिमध्ये व्हायरस अगदी सहज प्रवेश करू शकतो. त्यामुळे अँड्रॉइड फोन वापरणाऱ्यांनी विशेष काळजी घ्यायला हवी.

✻ मेमरी कार्ड दुरूस्त करण्यासाठी ते आधी कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपला कनेक्ट करा. कार्ड रिडरच्या मदतीने तुम्ही ते कनेक्ट करू शकता.

✻ यानंतर कंट्रोल प्लस आर ही कमांड द्या. आता ओपन झालेल्या विंडोत सीएमडी ही अक्षर लिहून एंटर करा.

✻ तुमच्या मेमरी कार्डचं नाव

त्यात टाका. नाव टाकून एंटर करा.

✻ आता तुम्हाला एक मेसेज येईल. त्यात 'येस' साठी 'वाय' आणि 'नो' साठी 'एन' ही अक्षरं असतील.

✻ यापैकी 'वाय'वर क्लिक केल्यानंतर मेमरी कार्ड फॉरमॅट होईल. आता तुमचं मेमरी कार्ड सुरू होईल.

✻ या पद्धतीने मेमरी कार्ड दुरूस्त होईल. पण त्यावरचा डाटा मिळणार नाही. त्यामुळे कार्डवरचा डाटा लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर सेव्ह करून ठेवा.

चित्र रंगवा



व्हॉट्स ॲपवर बनवा स्वतःचा स्टीकर

स्मार्ट ॲप्स

छोट्या दोस्तांनो, व्हॉट्स ॲपमध्ये सतत नवी अपडेट्स येत असतात. काही नवे बदलही घडत असतात. व्हॉट्स ॲपमधल्या स्टीकरचा पर्याय अनेकांना आवडतो. तुम्हालाही हे स्टीकर्स खूप आवडत असतील. स्टीकर्सच्या माध्यमातून आपल्या भावना अगदी सहज दुसऱ्यापर्यंत पोहचू शकतात. गूगल प्ले स्टोअरमधून तुम्ही स्टीकर्स डाउनलोड करू शकतात. कोणाचा वाढदिवस असो किंवा एखादा सण असो, तुम्ही छानसा स्टीकर पाठवू शकता. असं असलं तरी तुमच्या फोटोचं स्टीकरमध्ये रुपांतर करण्याचा पर्याय अजूनही उपलब्ध झालेला नाही. मात्र विविध ॲप्सच्या माध्यमातून तुम्ही तुमच्या फोटोचं रुपांतर व्हॉट्स ॲप स्टीकरमध्ये करू शकता.



यासाठी अर्थातच तुम्हाला स्टीकर मेकर हे ॲप डाउनलोड करावं लागेल. हे ॲप ओपन केल्यानंतर तुमच्यासमोर क्रिएट अ न्यू स्टीकर पॅक हा पर्याय दिसेल. इथे तुम्ही तुमच्या स्टीकर पॅकला नाव देऊ शकता. मग स्टीकर पॅकचं फोल्डर तयार होईल. तुम्ही त्यावर क्लिक करा. इथे तुम्हाला बरेच बॉक्स दिसतील. त्यापैकी एका बॉक्सवर क्लिक करा. यानंतर ओपन गॅलरी हा पर्याय निवडून एखाद्या फोटोवर टॅप करा. इथे तुम्ही योग्य प्रकारे फोटो एडिट करून सेव्ह स्टीकरवर क्लिक करा. यानंतर तुमच्या आवडीच्या फोटोचा स्टीकर तयार होईल. तुम्ही हे स्टीकर शेअर करू शकता. मग काय दोस्तांनो, करणार ना तुमच्या फोटोचा स्टीकर?

ठिपके जुळवा

मनोहारी थायलंड

सफर देशांची

थायलंड हा दक्षिण-पूर्व आशियातला खंडातला देश. बँकॉक ही त्याची राजधानी. थायलंडमध्ये पर्यटक मोठ्या संख्येने येतात. मलेशिया, बर्मा, लाओस आणि कंबोडिया या देशांच्या सीमा थायलंडला लागून आहेत. 'मुआंग थाई' हे या देशाचं अधिकृत नाव. पण जगभरात त्याची ओळख थायलंड अशीच आहे. थाई ही इथली अधिकृत भाषा तर लोकसंख्या ७० दशलक्ष एवढी. भात, कॉफी, साखर, मीठ, नारळ, रबर, साखर यांचं उत्पादन थायलंडमध्ये घेतलं जातं. वेगवेगळे उद्योगही इथे आहेत. मासेमारी, पेपरनिर्मिती, सिल्क आणि कॉटनच्या कपड्यांची निर्मिती, पर्यटन, हस्तकला, खाणकाम असे उद्योग इथे आहेत. थायलंडमध्ये बौद्धधर्मीय अधिक आहेत. बँकॉक, चियांग माई आणि पटाया ही इथली प्रमुख शहरं.

थायलंडमध्ये आधुनिक आणि पारंपरिक जीवनशैलीचा मिलाफ पहायला मिळतो. इमारतीही पारंपरिक तसंच आधुनिक पद्धतीने बांधण्यात आल्या आहेत. बँकॉक हे थायलंडमधलं सर्वात गर्दीचं शहर. चाओ फराया नावाची नदी बँकॉकमधून वाहते. ही नदी इथल्या जलवाहतुकीचं केंद्र आहे. थायलंडमध्ये राजेशाही आहे. बँकॉकमध्ये सुंदर बौद्ध मंदिरंही आहेत. बँकॉक आणि देशाच्या इतर भागांमध्ये कालव्यांचं जाळं आहे. हा विविधतेने नटलेला असा देश आहे. थायलंडचा उत्तरेकडचा भाग डोंगराळ आहे तर दक्षिणेकडे घनदाट जंगल आहे.

दोस्त हे मस्त

फ्लाईटलेस कॉर्मोरेंट

गॅलापॅगोस बेटांवर फ्लाईटलेस कॉर्मोरेंट हे पक्षी आढळतात. या पक्ष्यांची गणना अत्यंत दुर्मीळ प्रजातींमध्ये होते. अवघे १००० कॉर्मोरेंट शिल्लक राहिले आहेत. या पक्ष्याची पिसं काळ्या आणि करड्या रंगाची असतात. त्यांचे पंख आकाराने छोटे असतात. पण पाण्यात ते अत्यंत चपळतेने वावरतात. पावलं आणि पायांचा वापर करून ते समुद्राचा तळ गाठतात. मासे, ईल आणि ऑक्टोपस हे या पक्ष्यांचं मुख्य अन्न आहे.

खादाडी

स्वादिष्ट ॲपल रेस स्नॅक्स

मुलामुलींनो, फळं खाण्यात थोडं ट्विस्ट आणलं तर? म्हणूनच आपण ॲपल रेस कार स्नॅक्स ही रेसिपी बनवू या. यासाठी चार मोठी सफरचंदं, १६ हिरवी द्राक्षं, १६ टूथपिक हे साहित्य घ्या. द्राक्षं अर्धी कापून घ्या. सफरचंदाचे चार तुकडे करा. आता सालाचा भाग वर ठेवा. आता टूथपिक घ्या. गरामधून टूथपिक आरपार जाऊ द्या. आता द्राक्षाचा अर्धा भाग दोन्ही बाजूंनी टूथपिकलाा लावा. सफरचंदाची गाडी तयार झाली!

लाईफस्टाईल

दात घासताना...

सकाळी उठल्यावर आपण दात घासतो. दात घासण्याआधी ब्रश पाण्याने ओला करण्याची सवय काहींना असते. पण ही सवय चुकीची आहे. टूथपेस्टवर पाणी ओतल्याने तिची क्षमता कमी होते. यामुळे दातांचं नुकसान होऊ शकतं. दात घासल्यानंतर नीट चूळ भरायला हवी. दातांमध्ये टूथपेस्टचा अंश राहणार नाही याची काळजी प्रत्येकाने घ्यायला हवी.

योगा टाईम

मांजरासारखं आसन

छोट्यांनो, योगासनांमध्ये मांजरासारखं आसनही आहे. यासाठी हाताचे पंजे आणि गुडघे खाली टेकवून प्राण्यांच्या स्थितीत या. पाठीला गोलाकार बाक यायला हवा. हनुवटी छातीजवळ नेण्याचा प्रयत्न करा. यामुळे चेहऱ्याचे स्नायू बळकट होतात.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2021)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)